


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २६९ ■ बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# 2027 च्या जनगणनेचे बिगुल वाजले

## स्व-गणना पोर्टल पहिल्यांदाच होणार सुरु

प्रतिनिधी ८ एप्रिल




**अकोला:** येत्या २०२७ च्या घर नोंदणी आणि घर गणना मोहिमेसाठी केंद्र सरकारने तयारी पूर्ण केली असून यासाठी अधिकृत प्रश्नावली प्रसिद्ध करण्यात आली आहे. या मोहिमेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नागरिक आता (https://es.census.goved.in) या पोर्टलवर जाऊन स्वतःची माहिती नोंदवू शकणार आहेत. महाराष्ट्रासाठी हे पोर्टल १ मे रोजी ओपन होणार असून ते १५ मे पर्यंत खुले असेल अशी माहिती प्राप्त झाली आहे.

यावेळी एकूण ३४ प्रश्नांचा समावेश असलेली विस्तृत प्रश्नावली तयार करण्यात आली आहे. यामध्ये घराचे स्वरूप, उपलब्ध सुविधा आणि कुटुंबाकडील मालमत्ता यांची माहिती घेतली जाईल. घराचे छप्पर, भिंती आणि जमिनीसाठी वापरलेले साहित्य (उदा. सिमेंट, विटा, दगड किंवा टाइल्स) याची नोंद केली जाईल.मूलभूत सुविधा मध्ये पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत, वीज, शौचालयाचा प्रकार आणि स्वयंपाकाच्या इंधनाबाबत माहिती द्यावी लागेल.मालमत्तमध्ये कुटुंबाकडे रेडिओ, टेलिव्हिजन, लॅपटॉप, इंटरनेट सुविधा, सायकल, मोटारसायकल किंवा चारचाकी वाहन आहे का, याची विचारणा केली जाईल. कुटुंबात प्रामुख्याने कोणत्या धान्याचा (तांदूळ, गहू, ज्वार, बाजरी इ.) वापर केला जातो, याचीही नोंद घेतली जाणार आहे.

जरी नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने 'स्व-गणना' केली असली, तरी प्रगणक प्रत्यक्ष घरी येऊन या माहितीची पडताळणी करतील. ही सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार असून, केवळ जनगणनेच्या कामासाठी तिचा वापर केला जाईल. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती संबंधित विशेष नोंदीही यावेळी केल्या जाणार आहेत.



### या धर्मातील लोकच एस सी मध्ये समाविष्ठ

अनुसूचित जाती अर्थात एस सी संबंधी नियम अधोरेखित केला गेला आहे. 'अनुसूचित जाती' प्रवर्गाची नोंद ही विशिष्ट धार्मिक चौकटीतच केली जाते. जर कुटुंबाचा प्रमुख स्वतःला अनुसूचित जातीचा मानत असेल, तर तो केवळ हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माचा असणे आवश्यक आहे. जर एखादी व्यक्ती इतर कोणत्याही धर्माची (उदा. ख्रिश्चन, इस्लाम इ.) असेल, तर त्यांना अनुसूचित जाती म्हणून नोंदवता येणार नाही. अनुसूचित जमातींच्या बाबतीत धार्मिक बंधने लागू होत नाहीत. अनुसूचित जमातीची अर्थात एस टी व्यक्ती कोणत्याही धर्माचे पालन करत असली, तरी त्यांची नोंद 'अनुसूचित जमाती' अर्थात शेड्युल ट्राईब्स म्हणून केली जाऊ शकते. यामध्ये हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन किंवा इतर कोणत्याही स्थानिक निसर्गपूजक धर्माचे पालन करणाऱ्या आदिवासी बांधवांचा समावेश होतो.

### महाराष्ट्रात भर उन्हाळयात जनगणना

महाराष्ट्रातील नागरिक स्वतःची मोजणी करण्यासाठी स्वतःच्या मोबाईलचा एकच क्रमांक वापरत नोंदणी करु शकतात. ही नोंदणी नागरिक स्वतःच १ मे ते १५ मे या कालावधीत करु शकतील. पण, प्रगणक घरोघरी जावून मोजणी ही महाराष्ट्रात भर उन्हाळयात अगदी ज्या वेळी अकोल्याचे तापमान ४५ अंशावर असते त्यावेळी ही जनगणना होणार आहे. अर्थात घर नोंदणी व मोजणीसाठी महाराष्ट्रात १६ मे १४ जून हा कालावधी निश्चित केला आहे. गुजरात, पश्चिम बंगाल, झारखंड येथील जनगणनेच्या तारखा निश्चित केल्या नाहीत.

# महावितरण उतरणार शेअर बाजारात!

प्रतिनिधी ८ एप्रिल


**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाने महावितरणच्या आर्थिक व प्रशासकीय पुनर्रचनेला मंजुरी देत मंगळवारी मोठा निर्णय घेतला त्यानुसार महावितरण कंपनीची शेअर बाजारात नोंदणी होणार असून, कृषी वीज वितरणासाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सध्या 'महावितरण' वर सुमारे ३२,६७१ कोटी रुपयांचे कर्ज आहे. त्यावर मोठ्या प्रमाणात व्याज भरावे लागत असल्याने कंपनी आर्थिक अडचणीत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने कंपनीला शेअर बाजारात आणण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारी हमीवर कंपनी बॉंड्स जारी करून ३२,६७१ कोटी रुपये उभारणार असून, त्यामुळे कर्जभार कमी होईल.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दर निर्धारण प्रकरणात कृषी ग्राहकांसाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार ऊर्जा विभागाने महाराष्ट्र सोलर अॅग्री पॉवर लिमिटेड स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला होता. कृषी फीडर आधीच वेगळे करण्यात आले आहेत. या प्रक्रियेमुळे वीजदर कमी करण्यास मदत होईल. या निर्णयाने जनतेला दिलासा मिळणार आहे.

# युद्ध संपले, 24 तासांत ट्रम्प यांचा यू-टर्न!

## इराणच्या पुनर्निर्माणासाठी सहकार्य...!



वृत्तसंस्था ८ एप्रिल

**वॉशिंग्टन :** 'संपूर्ण संस्कृती मिटवून टाकू,' अशी भीषण धमकी देणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अवघ्या २४ तासांत आपल्या भूमिकेत मोठा बदल केला आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांचा 'सीझफायर' (युद्धविराम) जाहीर झाल्यानंतर, ट्रम्प यांनी आता इराणच्या पुनर्निर्माणासाठी मदत करण्याची घोषणा केली आहे.

या निर्णयामुळे मिडल ईस्टमध्ये गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या महायुद्धाच्या सावटाखालील जगाला मोठा दिलासा मिळाला आहे.

अवघ्या एक दिवसापूर्वी ट्रम्प यांनी इराणला ४८ तासांची मुदत देत 'अस्तित्व संपवण्याची' भाषा केली होती मात्र, चीनच्या मध्यस्थीनंतर इराणने '१० कलमी' शांतता प्रस्ताव मान्य केला आणि परिस्थिती निवळली. ट्रम्प यांनी आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत म्हटले की, 'इराणला आता शांतता हवी आहे.

### पुनर्निर्माणासाठी निधी कुठून येणार?

एका रिपोर्टनुसार, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांकडून इराण आणि ओमान 'ट्रान्झिट फी' आकारू शकतात. या पैशांचा वापर युद्धात झालेल्या नुकसानीची भरपाई आणि इराणच्या पुनर्निर्माणासाठी केला जाण्याची शक्यता आहे. या तहामुळे इराणमधील लोकांमध्येही उत्साहाचे वातावरण असून त्यांनी रस्त्यावर उतरून आनंद साजरा केला आहे.

### ही युद्धबंदी म्हणजे युद्धाचा शेवट नाही : खामेनेई

इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेने स्पष्ट केले की, जरी आम्ही सध्या गोळीबार थांबवला असला, तरी आमचे लक्ष शत्रूच्या प्रत्येक हालचालीवर आहे. इराणच्या सरकारी वाहिनीवर मोज्तबा खामेनेई यांचा संदेश वाचून दाखवण्यात आला. यात त्यांनी म्हटले आहे की, 'सर्व लष्करी शाखांनी आदेशाचे पालन करून गोळीबार थांबवावा, पण सावध राहावे. शत्रूने थोडी जरी चूक केली, तर त्याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल.' ही युद्धबंदी म्हणजे युद्धाचा शेवट नाही, असेही मोज्तबा खामेनेई यांनी म्हणत भविष्यातील युद्धाचे संकेत दिले आहेत.

### इराणच्या त्या '१० अटी'

कोणतेही आक्रमण नाही, होर्मुझच्या सामुद्रधुनीवर इराणचे नियंत्रण कायम, संवर्धनाची स्वीकृती, सर्व प्राथमिक निर्बंध हटवणे, सर्व दुय्यम निर्बंध हटवणे, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे सर्व ठराव रद्द करणे, आयएईएच्या नियामक मंडळाचे सर्व ठराव रद्द करणे, इराणला नुकसान भरपाई देणे, या प्रदेशातून अमेरिकेच्या लढाऊ सैन्याची माघार, लेबनॉनमधील शौर्यपूर्ण इस्लामी प्रतिकारासह सर्व आघाड्यांवरील शत्रुत्व थांबवणे.

# आता क्वॉंटिटी नको क्वॉलिटी हवी!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा संदेश

प्रतिनिधी ८ एप्रिल

**मुंबई :** उपमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे भाकरी फिरवण्याच्या तयारीत असल्याचे शिवसेनेच्या सूत्रांची माहिती आहे. जे काम करतील तेच पदावर राहतील, जे पदावर असून काम करत नाही त्यांना डच्चू देणार, असे स्पष्ट आदेश एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यामुळेच मागील आठवड्यात पुण्यात शिवसेनेची पूर्ण कार्यकारिणीच बरखास्त केली गेली. यातून राज्यातील इतर पदाधिकाऱ्यांना थेट संदेश देण्यात आला आहे.

एकनाथ शिंदे मंत्री, आमदार, खासदार, संपर्क प्रमुख, विभाग प्रमुख, महिला आघाडी, जिल्हा आणि शहर प्रमुख तसेच शाखा प्रमुखांच्या कामाचा आढावा देखील स्वतः घेऊन त्यांचे परीक्षण करणार असल्याने ज्यांना पद आहे, त्यांने पक्ष संघटना वाढीसाठी काम केलेच पाहिजे, असेच निर्देश बघायला मिळत आहेत. आता निवडणुका तीन वर्ष तरी नाहीत. त्यामुळे राज्यातील सर्वच्या सर्व ४३ हजार गावांपर्यंत शिवसेना पोचण्यासाठी कामाला लागा, असेही आदेश एकनाथ शिंदे यांचे आहेत. सध्या जाहीर करण्यात आलेल्या संपर्क प्रमुख यादीत देखील अनेक आमदार खासदार यांची नावे, त्यांना स्वतःचा मतदार संघ बघून संपर्क प्रमुख असलेल्या जिल्ह्याची आणि लोकसभा मतदार संघाची देखील जबाबदारी बघावी लागणार आहे. त्यांचा कामाचा रिपोर्ट वरिष्ठांना सादर होणार आहे. आता निवडणूक नसल्याने एकनाथ शिंदे यांचे सर्व लक्ष पक्ष संघटना वाढीकडे असल्याची सूत्रांची माहिती आहे.

### भाजपच्या पावलावर पाऊल!

भाजप पक्षाची काम करण्याची पद्धत कशी आहे तशीच आता शिवसेनेची असणार आहे. निवडणूक नाही मात्र मतदार याद्यांवर काम करण्यास सांगण्यात आले आहे. येणाऱ्या वर्षात मतदारसंघाचे विभाजन होणार आहे. त्यासाठी शिवसेना पक्ष तयार असला पाहिजे. म्हणून मतदार याद्यांवर फोकस करा, असे आदेश एकनाथ शिंदेंनी दिल्याची सूत्रांची माहिती आहे.

### एकनाथ शिंदे दोन मंत्र्यांवर नाराज

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत आलेले निकाल पाहता, शिवसेनेतील अकार्यक्षम दोन मंत्र्यांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा आहे. लोकसभा आणि त्या पाठोपाठ झालेल्या विधानसभा निवडणूकीत पक्षातील नेत्यांकडून अपेक्षित कामगिरी झाली नाही. या निवडणुकीत शिंदे पायाला भिंगरी लावून प्रत्येक जिल्ह्यात प्रचारासाठी गेले. मात्र काही मंत्री आपल्या जिल्ह्यांत तळ ठोकून असतानाही पक्षाच्या जागा आल्या नाहीत.

# शस्त्रसंधीने शेअर बाजाराला भरते!

## सेन्सेक्सची ७७२०० अंकांवर झेप

प्रतिनिधी ८ एप्रिल

**मुंबई :** मध्यपूर्वेत गेल्या एका महिन्यापासून सुरू असलेला तणाव एका मोठ्या आणि निर्णायक वळणावर पोहोचत असतानाच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर इराणवरील हल्ले दोन आठवड्यांसाठी थांबवण्यास सहमती दर्शवल्याचे जाहीर केले. पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ आणि फील्ड मार्शल आसिम मुनीर यांच्याशी चर्चा केल्यानंतर अमेरिकेने निर्णय घेतल्याचे जाहीर केले गेले असून ही बातमी धडकताच आशियाई शेअर बाजारात आनंदाचे भरते आले.

अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाला दोन आठवड्याचा विराम लागल्यानंतर बुधवारी जगभरातील शेअर बाजारांमध्ये तेजी दिसून येत आहे.

अमेरिका आणि इराणमधील शस्त्रसंधीनंतर अमेरिकन शेअर बाजाराने रॉकेटच्या वेगाने उसळी घेतली, तर कच्च्या तेलाच्या किमती धाडकन कोसळल्या. जागतिक बाजारातील सकारात्मक संकेतांचा मागोवा घेत भारतीय शेअर बाजारातही तुफानी सुरुवात झाली. मुंबई शेअर बाजाराचा बीएसई सेन्सेक्स बाजाराच्या सुरुवातीला २६०० पेक्षा जास्त मोठी उसळी घेऊन ७७२०० अंकांवर पोहोचला तर एनएसई निफ्टी५० निर्देशांकही तब्बल ८०० अंकांची झेप २३९१२ वर ट्रेड करत आहे. त्याचवेळी, काही मिनिटांत रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण बैठकीतील निर्णयही जाहीर होतील.रेपो दरामध्ये यंदा वाढ होणार नाही, अशी अपेक्षा असून बाजारपेठ याकडे सकारात्मकतेने पाहत आहे. याशिवाय आशियाई बाजारांमध्येही तेजीच तुफान आलं.

# डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात महाभियोग चालणार?

वृत्तसंस्था ८ एप्रिल

**वॉशिंग्टन :** इराणविरोधातील युद्धाने अमेरिकेत एक मोठा गट डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात आक्रमक झालेला आहे. युद्ध नको म्हणून कोट्यवधी नागरिक गेल्या आठवड्यात रस्त्यावर उतरले होते. ट्रम्प यांच्या युद्ध खोर धोरणाविरोधात अमेरिकेत मोठे प्रदर्शन झाले. तर आता युद्धबंदी जाहीर केल्यानंतर डेमोक्रॅट्सच नाही तर रिपब्लिकन खासदारही ट्रम्प यांच्यावर तुटून पडले आहेत. जगात अमेरिकेची नाचक्की केल्याचा आरोप ट्रम्प यांच्यावर करण्यात आला आहे. डेमोक्रॅटिक खासदारांनी सोशल मीडियावर ट्रम्प यांना लक्ष्य केले आहे. हे खासदार लवकरच २५ व्या घटनादुरुस्ती आधारे ट्रम्पविरोधात महाभियोग आणणार असल्याचा दावा करण्यात येत आहे.

# खरातला दुसऱ्या गुन्ह्यात २१ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी

प्रतिनिधी ८ एप्रिल

**नाशिक :** सरकारवाडा पोलीस ठाण्यात दाखल ७५/२०२६ ह्या दुसऱ्या गुन्ह्यात २१ एप्रिल पर्यंत न्यायालयीन कोठडी मिळाली आहे. अशोक खरात ला तिसऱ्या गुन्ह्यात पोलिसांकडे ताबा मिळावा म्हणून विशेष तपास पथकातर्फे अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने अशोक खरात यांस उद्या न्यायालयात हजर करण्यास सांगितले, विशेष तपस पथक ७६/२०२६ ह्या तिसऱ्या गुन्ह्यात अशोक खरातला वर्ग करत तुरुंगातून ताब्यात घेऊन उद्या न्यायालयात हजर करणार आहेत.




# साध्या एसटी बसची 15 एप्रिलपासून हंगामी भाडेवाढ

## सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री; स्वच्छता अधिभारचाही बोजा

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोला :** उन्हाळी सुट्टीत एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आता अधिक रुपये मोजावे लागणार आहेत. राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने सुट्टीचा हंगाम लक्षात घेता प्रवाशांवर १० टक्के हंगामी भाडेवाढीसह प्रति तिकिटामागे दोन रुपये असा स्वच्छता अधिभार घेण्याचा निर्णय घेतला आहे. हंगामी भाडेवाढ केवळ साध्या गाड्यांना असून स्वच्छता अधिभार सरसकट एसटी गाड्यांना लागू राहणार आहे. ही भाडेवाढ १५ एप्रिलपासून लागू होणार आहे. एकप्रकारे सर्वसामान्यांना आर्थिक फटका देणारी ही भाडेवाढ आहे.

राज्य परिवहन प्राधिकरणाने (एसटीए) एसटी महामंडळाला यात्रा, उन्हाळी सुट्टी आणि सणासुदीच्या दिवसांत ३० टक्क्यांपर्यंत भाडेवाढ करण्यास मंजुरी दिली आहे. सन २०२६च्या उन्हाळी हंगामासाठी १० टक्के प्रवासी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार भाडेवाढ १४ एप्रिलच्या मध्यरात्रीनंतर लागू होणार आहे. उन्हाळी भाडेवाढ ही केवळ दोन महिन्यांसाठी असून स्वच्छता अधिभार हा कायमस्वरूपी असणार आहे. एसटी महामंडळाकडे सफाई कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. त्यामुळे एसटी गाड्यांसह स्थानके आणि आगार स्वच्छतेसाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येणार आहे. प्रवासी स्वच्छतेसाठी असलेल्या उपक्रमासाठी प्रति तिकीट दोन रुपये स्वच्छता अधिभार घेण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. १४ एप्रिलच्या मध्यरात्रीपासून अधिभार आकारण्यात येणार आहे.

महिला सन्मान योजना, ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक आणि अन्य सवलतधारी प्रवाशांना हा अधिभार लागू असणार नाही. आवडेल तेथे प्रवास योजनेंतर्गत चार आणि सात दिवसांचा पास देण्यात येतो. अशा प्रवाशांसाठी पाच रुपये अधिभार असणार आहे. पास देताना प्रवाशांकडून ही रक्कम वसूल करण्यात येणार आहे. आगाऊ आरक्षणातून काढलेल्या पासवर स्वच्छता अधिभार असणार नाही. एसटीच्या बसगाड्या भाडेतत्त्वाने घेणाऱ्यांना प्रति बस ५० रुपये इतका अधिभार द्यावा लागणार आहे, असे एसटी महामंडळाने स्पष्ट केले आहे.



### ई-बस गाड्यांना वगळले

१५ एप्रिल ते १५ जून या कालावधीसाठी एसटीची भाडेवाढ लागू होणार आहे. भाडेवाढ केवळ साध्या बसगाड्यांसाठी असेल. भाडेवाढीतून हिरकणी, शयनयान, शिवशाही, जनशिवनेरी, शिवनेरी या गाड्यांसह ई-बस गाड्यांना वगळण्यात आले आहे. उन्हाळी हंगामासाठी आगाऊ आरक्षण केलेल्या प्रवाशांकडून फरकाची रक्कम प्रवासादरम्यान वसूल करण्याच्या सूचना महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी दिल्या आहेत.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
बुधवार, दि.८ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

*नुकताच महाराष्ट्राचा २०२५-२०२६ चा आर्थिक सर्वेक्षण अहवाल विधिमंडळात सादर करण्यात आला. या अहवालात राज्याच्या भक्कम आर्थिक कामगिरीवर प्रकाश टाकला आहे. वर्ष २०२५-२६ या वर्षात महाराष्ट्राचे नाममात्र सकल राज्य देशांतर्गत उत्पादन (जीएसडीपी), म्हणजे राज्याच्या भौगोलिक सीमांतर्गत एका वर्षात उत्पादित केलेल्या सर्व वस्तू आणि सेवांचे सध्याच्या बाजार भावातील एकूण आर्थिक मूल्य, यामध्ये महागाईचा प्रभाव समायोजित केला जात नाही, ५१ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे व भारताची सर्वात मोठी राज्य अर्थव्यवस्था म्हणून महाराष्ट्र आपले स्थान कायम राखेल, असे नमूद करण्यात आले आहे. भारताच्या एकूण सकल देशांतर्गत उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा अंदाजे १४. ३ टक्के इतका आहे. तसेच, २०२५-२६ मध्ये दरडोई उत्पन्न ३,४७,९०३ रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. राज्याच्या 'वास्तव' सकल राज्य देशांतर्गत उत्पादनामध्ये, म्हणजे महागाईचा परिणाम वजा करून, एका निश्चित आधारभूत वर्षाच्या (२०११-१२) किमतींवर आधारित राज्याच्या भौगोलिक सीमांतर्गत उत्पादित सर्व अंतिम वस्तू आणि सेवांचे एकूण आर्थिक मूल्यात ,७. ३ टक्के वाढ अपेक्षित असून, ही वाढ राष्ट्रीय सकल देशांतर्गत उत्पादन वाढीच्या ६. ५ टक्के या अंदाजित दरापेक्षा अधिक आहे.*

# राज्याच्या प्रगत विभागात विकासाचा असमतोल

राज्यात प्रमुख विकास क्षेत्रांनी यात दमदार वाढ नोंदवली आहे, कृषी आणि संलग्न उपक्रमांनी ८.७ टक्के वाढीसह यात आघाडी घेतली, त्यानंतर सेवा क्षेत्र (७.८ टक्के) आणि उद्योग क्षेत्र (४.९ टक्के) यांचा क्रमांक लागतो. राज्याने राष्ट्रीय वस्तू निर्यातीत महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, 'स्टार्टअप' नोंदणी आणि 'युनिकॉर्न' कंपन्यांच्या संख्येत देशात आघाडी घेतली आहे. देशातील एकूण थेट परकीय गुंतवणुकीत (एफडीआय) महाराष्ट्राचा वाटा ३१ टक्के असून, भारतात राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. वित्तीय तूट ही नाममात्र सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या २.७ टक्के राहण्याचा अंदाज आहे, जी वित्तीय जबाबदारी आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन अधिनियम, २००३ (फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी अँड बजेट मॅनेजमेंट, एफआरबीएम) नियमांनुसार मर्यादेत आहे, ही बाब निश्चितच आशादायक आहे. तसेच महाराष्ट्र राज्याचे थकीत कर्ज सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या सुमारे १८.३ टक्के आहे. हे प्रमाण रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि केंद्र सरकारने निश्चित केलेल्या २५ टक्क्यांच्या मर्यादेपेक्षा कमी असल्याने राज्याची आर्थिक स्थिती स्वीकारार्ह आणि नियंत्रणात मानली जाते. निरंतर विकास तो पण सर्वसमावेशक व समतोल हे कोणत्याही राज्याचे उद्दिष्ट असते. ङपण काय महाराष्ट्राच्या विकासात समतोलपणा साधता आला आहे का?

महाराष्ट्र राज्याचे प्रशासकीय कामकाज सहा प्रशासकीय विभागातून चालते. हे विभाग राज्यभरातील ३६ जिल्ह्यांचे नियोजन आणि महसूल प्रशासनाचे काम पाहतात. कोकण विभाग, पुणे विभाग, नाशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर विभाग, अमरावती विभाग, वनागपूर विभाग हे ते सहा प्रशासकीय विभाग आहे.

दरडोई उत्पन्न (पर कॅपिटा इन्कम) हे एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीने कमावलेले सरासरी उत्पन्न मोजते; तसेच ते आर्थिक सुदृढता, समृद्धी आणि राहणीमानाचा दर्जा यांचे एक प्रमुख निर्देशक म्हणून कार्य करते.आज महाराष्ट्राच्या सहा विभागांच्या दरडोई उत्पन्नात (२०२४-२०२५) फार मोठा फरक आहे. कोकण विभागाचे (मुंबई, ठाणे रायगड ,रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हे) सरासरी दरडोई उत्पन्न हे सर्वाधिक असून ते ४,५७,३६१ रुपये आहे, तर अमरावती विभागाचे (बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती व यवतमाळ जिल्हे) दरडोई उत्पन्न सर्वात कमी म्हणजे फक्त १,८९,९९१ रुपये आहे. या दोन विभागातील फरक तब्बल २.४१ पटीचा आहे. पुणे विभागाचे (पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हे) दरडोई उत्पन्न हे ३,५१,५३० रुपये आहे. नाशिक विभागाचे (अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्हे) २,४६,०२४ रुपये आहे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे (छत्रपती संभाजी नगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, धाराशिव व लातूर जिल्हे) २,१५,६९७ रुपये आहे, तर नागपूर विभागाचे (वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे)



दरडोई उत्पन्न २,८२,७९२ रुपये आहे. महाराष्ट्रातील सहा विभागातील दरडोई उत्पन्ना बाबतीतची तफावत हे असमतोल विकासाचे द्योतक आहे. ङपण काय महाराष्ट्रात विभागांतर्गत तरी समतोल विकास झाला आहे का, हे बघणे पण जरूरीचे ठरते.


विचरण गुणांक (कोएफिशिएंट ऑफ व्हेरिएशन- सीव्ही) व गिनी गुणांक (गिनी कोएफिशिएंट) हे दोन्हीही उत्पन्नाची असमानता मोजण्याचे सांख्यिकीय साधने आहेत. पण सर्वाधिक उत्पन्न असणाऱ्या घटकांमध्ये संपत्तीचे केंद्रीकरण किती आहे, हे अधोरेखित करावयाचे असेल तर विचरण गुणांक (सीव्ही) हा अधिक योग्य पर्याय ठरतो. त्यामुळे महाराष्ट्रातील विभागांमध्ये व विभागांतर्गत असलेली आर्थिक असमानता पाहण्यासाठी विचरण गुणांकाव्दारेच (सीव्ही) ती बघणे जरूरीचे आहे. वितरण गुणांक हे प्रमाणित विचलन (स्टँडर्ड डेव्हिएशन) आणि सरासरी (अरिथमॅटीक मिन) यांचे गुणोत्तर असते.उच्च सीव्ही हे अधिक असमानता दर्शवते, तर कमी सीव्ही हे अधिक समान वाटप सूचित करते.

एकूण महाराष्ट्राचा दरडोई उत्पन्नाच्या संबंधातील सीव्ही हा ३१.२५ टक्के आहे, जो महाराष्ट्रात दरडोई उत्पन्नातील दरी खुप मोठी असल्याचे निदर्शनास आणतो. विभागनिहाय विचार केला तर महाराष्ट्रात कोकण विभागाचे दरडोई उत्पन्न राज्यात सर्वात जास्त आहे, व त्याचा सीव्ही पण सर्वात जास्त म्हणजे २३.५१ टक्के आहे, जो दरडोई उत्पन्नात उच्च असमानता दर्शविते.तर अमरावती विभाग ज्याचे दरडोई उत्पन्न हे राज्यात सर्वात कमी आहे, त्याचा सीव्ही हा सर्वात कमी म्हणजे १२.२४ टक्के आहे, जो दरडोई उत्पन्नात कमी असमानता दर्शविते. नाशिक विभागाचा सीव्ही हा २२.५१ टक्के, नागपूर विभागाचा सीव्ही हा २६.९३ टक्के, पुणे विभागाचा सीव्ही १६.८८ टक्के, तर छत्रपती संभाजी नगरचा १४.७३ टक्के आहे.यावरून स्पष्ट दिसते की महाराष्ट्रात जो विभाग हा दरडोई उत्पन्नात अग्रेसर आहे त्यातील श्रीमंत व गरीब जिल्ह्यांमधील अंतर मोठे आहे व ज्या विभागाचे दरडोई उत्पन्न कमी आहे, त्यातील जिल्ह्यांतील दरडोई उत्पन्नातील फरक पण नगण्य आहे, म्हणजेच ते जिल्हे आर्थिक दृष्ट्या जवळपास समानच आहे. एकंदरीत, महाराष्ट्रात जे विभाग दरडोई उत्पन्नात अग्रेसर आहे, त्या विभागातील जिल्ह्यांमध्ये आर्थिक विकास हा असमतोल झालेला दिसतो. म्हणजे 'श्रीमंत' विभागात पण काही ठराविक जिल्हांचाच विकास झालेला दिसतो.तसेच ज्या विभागाचे दरडोई उत्पन्न कमी आहे, त्यामधील जिल्ह्यांचा आर्थिक विकास (?) जवळपास सारख्या प्रमाणातच झालेला दिसतो. त्यामुळे एकीकडे महाराष्ट्राचा विकास जरी मोठ्या प्रमाणात होत असला तरी तो असमतोलतेकडे झुकलेला दिसतो.

त्यामुळे महाराष्ट्राचा समतोल व सर्वसमावेशक विकास होण्यासाठी विभागवार दरडोई उत्पन्नाच्या नुसत्या 'सरासरी' वरून विश्लेषण न करता, विचरण गुणांक (सीव्ही) पण उपयोगात आणले पाहिजे, ज्यामुळे विभागात असलेल्या असमतोलतेचा अंदाज येऊ शकतो व त्यानुसार विभागाच्या समतोल विकासासाठी पाऊले उचलणे शक्य होईल. त्याचप्रमाणे जिल्ह्यात पण काही तालुके इतर तालुक्यांपेक्षा विकासात मागे पडलेले दिसतात.येथे पण प्रत्येक जिल्हासाठी विचरण गुणांकाचा (सीव्ही) वापर करून प्रत्येक जिल्ह्याचा समतोल विकास करणे शक्य होईल. एकंदरीत राज्यातील विभागांचा व जिल्हात तालुक्यांचा समतोल विकास झाल्यास, महाराष्ट्र राज्याचा समतोल विकास व सर्वसमावेशक विकास साधणे शक्य होईल.

**प्रा.डॉ. संजय खडक्कार**
माजी तज्ज्ञ सदस्य, विदर्भ वैधानिक विकास मंडळ. मो. ७२७६६१४२६०

# 'गाथा रमाईची' ..करुणा आणि त्यागाची..!




मराठी साहित्याच्या विश्वात काही ग्रंथ असे जन्म घेतात, की ते केवळ वाचनापुरते मर्यादित राहत नाहीत, तर ते वाचकाच्या अंत:र्मनात घर करून बसतात. ते आपल्या विचारांना हलवतात, संवेदनांना जागृत करतात आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून टाकतात. 'गाथा रमाईची' हा असाच एक असामान्य, अंतःकरणाला भिडणारा आणि आत्म्याला स्पर्श करणारा ग्रंथ आहे. हा ग्रंथ केवळ एका स्त्रीच्या आयुष्याचा आलेख नाही; तो आहे एका युगाच्या वेदनांचा, संघर्षाचा आणि निःस्वार्थ त्यागाचा जिवंत साक्षीदार. लेखक पंजाबराव वर यांनी अत्यंत हळुवार, संवेदनशील आणि आदरयुक्त शब्दांत रमाईंच्या आयुष्याची ही गाथा उलगडली आहे. ग्रंथाच्या मुखपृष्ठावर दिसणारे माता रमाईंचे गंभीर, शांत आणि ममतेने ओथंबलेले रूप, आणि त्यांच्या पाठीशी उभे असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तेजस्वी व्यक्तिमत्त्व. या दोन प्रतिमा एकत्र येऊनच या ग्रंथाचा आत्मा स्पष्ट करतात. जणू हा ग्रंथ सांगतो, महामानवाच्या तेजामागे एक शांत, संयमी आणि त्यागमयी सावली उभी होती, ती म्हणजे रमाई.

रमाईंच्या बालपणाचा आलेख वाचताना वाचक अक्षरशः त्या काळात पोहोचतो. वणंदगावातील दारिद्र्य, भिकू आणि रूक्मिणी यांचे कष्टमय जीवन, आणि त्या गरिबीत उमललेली एक कोवळी कळी..रमा. ही कथा केवळ वर्णन नसून, ती जणू एक जिवंत चित्रपट आहे. आईची शिकवण, 'कष्टाविना मनुष्य मरतो, कष्टाने मरत नाही' ही ओळ जणू संपूर्ण जीवन तत्त्वज्ञान ठरते. या एका वाक्यातूनच रमाईंच्या संपूर्ण आयुष्याचा पाया रचला जातो.

बालवयातच आई-वडिलांचे छत्र हरपणे, भावंडांची जबाबदारी अंगावर घेणे, आणि तरीही मनात आशेचा दिवा जिवंत ठेवणे, हा रमाईंचा संघर्ष म्हणजे एक विलक्षण जिद्दीचा प्रवास आहे. लेखकाने या प्रसंगांना इतक्या जिवंतपणे शब्दबद्ध केले आहे की, वाचकाच्या डोळ्यांत नकळत पाणी येते. ही करुणा केवळ दुःखद नाही, तर ती मनाला परिपक्व करणारी आहे. रमाईंचं आयुष्य म्हणजे जणू एखाद्या नदीसारखं... अडथळ्यांनी भरलेलं, पण अखंड वाहणारं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी विवाह हा त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. एका अशिक्षित, साध्या स्त्रीने एका विलक्षण बुद्धिमान, ध्येयवेड्या पुरुषाच्या आयुष्यात अर्धांगिनी म्हणून प्रवेश करणं, हे केवळ नातं नसून, तो एक विचारांचा संगम आहे.

लेखकाने रमाईंच्या भूमिकेचं केलेलं चित्रण अत्यंत प्रभावी आहे. त्यांनी रमाईंचं अस्तित्व केवळ 'पत्नी' या चौकटीत मर्यादित न ठेवता, त्या एक प्रेरणास्त्रोत, एक शक्ती आणि एक निःशब्द आधारस्तंभ म्हणून उभ्या केल्या आहेत. बाबासाहेबांच्या शिक्षणप्रवासात, त्यांच्या संघर्षात आणि त्यांच्या ध्येयासाठीच्या धावपळीत रमाईंचं योगदान जणू पायाभूत आहे. त्या स्वतः उपासमार, हालअपेष्टा सहन करतात, पण पतीच्या स्वप्नांना कधीच तडा जाऊ देत नाहीत. रमाई म्हणजे मेणबत्ती, जी स्वतः जळते, पण दुसऱ्यांना प्रकाश देते. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक प्रसंग हा त्यागाचा, संयमाचा आणि निःस्वार्थ प्रेमाचा साक्षीदार आहे. पती परदेशात शिक्षणासाठी गेले असताना, घरातील संकटांना एकटीने सामोरे जाणारी रमाई, ही प्रतिमा अत्यंत हृदयद्रावक आणि प्रेरणादायी आहे.

भाषेच्या दृष्टीने हा ग्रंथ अत्यंत प्रभावी ठरतो. साधी, सरळ, पण मनाच्या गाभाऱ्यात पोहोचणारी भाषा. हीच या ग्रंथाची खरी ताकद आहे. कुठेही शब्दांचा दिखाऊपणा नाही, पण प्रत्येक वाक्य मनाला स्पर्श करतं. लेखकाने उपमा, रूपक आणि प्रतीक यांचा अत्यंत सुंदर वापर केला आहे. उदाहरणार्थ, रमाईंच्या आयुष्याची तुलना शांत चांदण्याशी किंवा मेणबत्तीशी करणे, या प्रतिमा केवळ अलंकार नसून, त्या वाचकाच्या मनात खोलवर रुजतात. या ग्रंथाचं सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे, तो वाचकाला अंत:र्मुख करतो.

रमाईंचं आयुष्य वाचताना आपण नकळत स्वतःच्या जीवनाचा विचार करू लागतो. 'आपण किती सहन करू शकतो?', 'आपली निष्ठा किती दृढ आहे?', 'आपल्या प्रेमात किती निःस्वार्थता आहे?' असे प्रश्न मनात उभे राहतात. रमाईंचं आयुष्य म्हणजे एक निःशब्द कविता आहे, जी कधीच उच्चारली गेली नाही, पण जी प्रत्येकाच्या मनात खोलवर उमटते. त्या स्वतः प्रकाशझोतात कधीच आल्या नाहीत, पण त्यांनी एका सूर्याला तेज देण्यासाठी स्वतःचं संपूर्ण अस्तित्व अर्पण केलं.

ग्रंथाच्या शेवटी येणारी रमाईंची करुणामय गाथा वाचताना वाचक अक्षरशः भारावून जातो. त्यांच्या आयुष्याचा शेवट हा जरी दुःखद असला, तरी त्यातून उमटणारी प्रेरणा ही अमर आहे. रमाई म्हणजे केवळ एक व्यक्ती नाहीत, त्या एक मूल्य आहेत, एक आदर्श आहेत, एक जिवंत प्रेरणा आहेत.

'गाथा रमाईची' हा ग्रंथ म्हणजे...
एक करुणेचा सागर आहे,
एक त्यागाचा दीपस्तंभ आहे,
आणि एका महान स्त्रीच्या निःशब्द तेजाची अजरामर गाथा आहे. शेवटी एवढंच म्हणावंसं वाटतं...
रमाई म्हणजे वेदनेतून उमललेलं कमळ आहे
त्या दुःखाच्या अंधारातही प्रकाश देणारी ज्योत आहे
आणि एका महामानवाच्या इतिहासामागे उभी असलेली निःशब्द शक्ती आहे. 'कथा रमाईची' ही कथा रमाईची ह्या ग्रंथात लेखक पंजाबराव वर यांनी अत्यंत काव्यमय, भावस्पर्शी आणि हृदयाला भिडणाऱ्या शैलीत लिहिलेला आहे. या ग्रंथात रमाईच्या जीवनप्रवासाचे चित्रण करताना लेखकाने शब्दांना भावनांची नाजूक किनार दिली आहे, ज्यामुळे वाचक रमाईच्या वेदना, संघर्ष आणि त्यागाशी एकरूप होतो. या पुस्तकाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्यातील काव्यमयता. गद्य असूनही प्रत्येक वाक्य जणू कवितेसारखे वाटते. त्यामुळे हा ग्रंथ केवळ चरित्रात्मक नसून एक साहित्यिक अनुभव बनतो. नुकतीच या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली असून, वाचकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आणि वाढत्या मागणीमुळे या नव्या आवृत्तीचे प्रकाशन झाले आहे. ही आवृत्ती रमाईच्या जीवनदृष्टीला अधिक व्यापक वाचकांपर्यंत पोहोचवणारी ठरत आहे.

गाथा रमाईची'....

**लेखक - श्री पंजाबराव वर ,** अकोला.
मो. ९९२२९२४६८४

---------------------------

**समीक्षण लेखन....**
डॉ. विनय वसंतराव दांदळे ,
वसंतकुंज, गोकुळ कॉलनी ,
अकोला - ४४४००१.
सुसंवाद - ९८२२२३१७६९.

# तप्त उन्हाचा बागबगीच्यावर परिणाम

तप्त उन्हाचा आणि कडक उन्हाळ्याचा बागबगीच्यावर होणारा परिणाम अत्यंत खोलवर असतो. ज्याप्रमाणे आपल्याला उन्हाचा त्रास होतो, तसाच परिणाम मुक्या झाडांवरही होतो. त्याचे काही मुख्य परिणाम आहेत. प्रखर सूर्यप्रकाशामुळे पानांच्या कडा तपकिरी पडतात आणि पाने करपल्यासारखी दिसतात. रंग जास्त उष्णतेमुळे पानांमधील हरितद्रव्य कमी होते, ज्यामुळे पाने पिवळी पडू लागतात.

बाष्पीभवन कमी करण्यासाठी झाडे स्वतःची पाने गुंडाळून घेतात किंवा आकसतात, जमिनीतील आणि पानांमधील पाण्याचे प्रमाण वेगाने कमी होते. यामुळे झाडे सुस्त किंवा कोमेजलेली दिसतात.जमीन तापल्यामुळे मुळांना पाणी शोषून घेणे कठीण जाते, परिणामी झाडाची वाढ खुंटते, अति उष्णतेमुळे झाडावर आलेली फुले सुकून गळून पडतात. कडक उन्हामुळे फळांची त्वचा कडक होते आणि आतल्या वाढीमुळे फळांना तडे जातात (उदा. लिंबू, डाळिंब), माती जास्त तापल्यामुळे त्यातील उपयुक्त सूक्ष्मजीव आणि गांडूळ मरतात, ज्यामुळे मातीचा पोत बिघडतो, अति उष्णतेमुळे माती कडक आणि कोरडी पडते, ज्यामुळे पाणी घातल्यास ते मुळांपर्यंत न जाता वाहून जाते.

**बगीच्याचा बचाव करण्यासाठी काही उपाय :**

पाणी देण्याची वेळ सकाळी लवकर (७ पूर्वी) किंवा संध्याकाळी उशिरा पाणी द्यावे, मल्चिंग झाडाच्या बुंध्याशी वाळलेला पालापाचोळा किंवा गवत टाकून माती झाकून ठेवावी. ग्रीन नेट शक्य असल्यास नाजूक रोपांवर हिरवी जाळी लावावी.



फवारणी पानांवर पाण्याचा हलका फवारा मारल्याने झाडांना थंडावा मिळतो. उन्हाळ्यात झाडांना खते देणे टाळावे, कारण खतांमुळे झाडाच्या शरीरातील उष्णता अधिक वाढून झाड जळण्याची शक्यता असते.

# काय हरवले सांग, शोधिशी..

**दिल्लीवरून शिकागोला जाणारी मध्यरात्रीची फ्लाईट मला गाठायची होती. त्यासाठी नागपूर विमानतळाकडे निघालो होतो. अमरावतीच्या इतवारी भागातील रस्त्यांवरील? गर्दी टाळण्यासाठी चालकाने कार गाडगेनगर रस्त्याकडे वळवली आणि मला महाविद्यालयीन काळातले दिवस आठवायला लागले.. टोलेजंग इमारतींनी व्यापलेल्या या भागात तेव्हा शेती होती. विदर्भ महाविद्यालयाच्या गेट पाशी कार येताच मी थांबवली. दार उघडून बाहेर पडताना मी चालकांना म्हणालो - 'दादा, तुम्ही चहा वगैरे पिऊन फ्रेश व्हा, तोपर्यंत मी येतोच,' उत्तराची प्रतिक्षा न करताच एका अनिवार असोशीने मी गेटमधून आत शिरलो. काळ्या पाषाणाची बुलंद इमारत समोर होती. थोडं थांबलो. शंभरी ओलांडलेल्या इमारतकडे डोळे भरून पाहिलं. गेट आणि इमारत यांच्यामध्ये गार्डन होता. त्यात पूर्वी असणारी भली थोरली आंब्याची दोन झाडं आता नाहीशी झाली होती.**



रविवार असल्याने शुकशुकाट होता. गार्डनला वळसा घालून इमारतीकडे जाणारे दोन रस्ते होते. डावीकडच्या रस्त्याने निघालो. इमारतीसमोर गार्डनच्या कंपाऊंडजवळच्या कोपऱ्यावर थबकलो.. वाटलं आता तास संपल्याची बेल होईल आणि जयंत, अशोक, आरजी, सुरेन, पद्मा लगेच तेथे येतील..हा कॉर्नर म्हणजे सोंदर्य न्याहाळण्याची आमची जागा होती .आमचे अभ्यासक्रमातल विषय वेगवेगळे होते.पण आवडीचे विषय मात्र समान होते. अशोक देशपांडे, जयंत महाजनी, रत्नाकर गुणवंत देशपांडे, सुरेंद्र पेशकार, प्रदीप डोईफोडे असा आमचा ग्रुप होता.प्रत्येकाच्या नावाचा संक्षेप आम्ही केला होता. मिष्किल विनोद करणारा सुरेश सुरोशे, एम.ए.च्या वर्गातले सुभाष घुरडे, श्याम पंचारिया..अशी सगळी नावं आणि अनेक प्रसंग आठवायला लागले.जयंत आमच्या सगळ्यात हुशार. इंग्रजीवर प्रभुत्व असलेला.वाटलं होतं हा इंग्रजीचा प्राध्यापक होणार.पण नियतीच्या मनात वेगळंच काही होतंष्ठदोन वर्षापूर्वी तो गेला. मन हळवं झालं.

थोडे पुढे पोर्चजवळ आलो. टाळ्यांचा कडकडाट कानात गुंजायला लागला...आचार्य रजनिश व्याख्यान देत होते नि मंडळाचा पदाधिकारी म्हणून त्यांच्या बाजूला बसून मी ऐकत होतो. तेव्हा ते भगवान झाले नव्हतेष्ठअनेक कार्यक्रम नजरेसमोरून सरकायला लागले. कानावर संगीताचे स्वर यायला लागले आमच्या अभ्यासक्रमात कविवर्य भा.रा.तांबे यांची समग्र कविता होती. तांब्याचं जन्म शताब्दी वर्ष होतं मराठी विभागाने त्यानिमित्ताने तांब्यांच्या कवितांवर समीक्षा लिहिण्याचा स्पर्धात्मक कार्यक्रम आयोजित केला होता . स्पर्धकाने आपले लेखन वाचून दाखवायचे आणि दोन स्पर्धाकांच्या मध्ये, तांब्याच्या प्रसिद्ध असलेल्या कवितांचे गायन करायचे असा तो कर्यक्रम होता.मी, तांबे यांच्या अजरामर अशा 'कळा ज्या लागल्या जीवा' या कवितेवर? स्वतंत्रपणे समीक्षा लिहिली होती. स्पर्धा सुरू झाली.पण स्पर्धक वाचायला आला की. सभागृहातले मुलं प्रचंड आरडाओरडा करायला लागले.त्यांना फक्त गाणे हवे होते. मी समीक्षात्मक लेख वाचला आणि विद्यार्थिनी गायिकेने ' कळा ज्या लागल्या जीवा' ही कविता गायला घेतली. ..सगळं सभागृह भारावून गेलं. त्यातली ,'समुद्री चहूकडे पाणी पिण्याला थेंब ही नाही ' ही ओळ अशा नजाकतीने गायिली, की त्यातला स्वर काळीज चिरत गेला. ष्ठ आजही वेळी अवेळी ते स्वर आठवतात आणि जीवाची तगमग होते. आयुष्यात संगीताच्या अनेक मैफिलींना गेलो.. अनेकांना भेटलोष्ठमुलाखती घेतल्या..पण मला अनेकदा प्रश्न पडतो, ईश्वरीय अलौकिकत्व लाभलेले कलावंत क्षणिक क्षुल्लक मोहात का अडकतात बरं. अस्वस्थ मनाने थोडे पुढे सरकलो.त्यावेळी असलेल्या,प्राध्यापक विश्रामकक्षाच्या बाजूला, सतरा नंबरच्या वर्गखोली नंतर गर्ल्स कॉमनरूम होती आणि त्यांच्या समोरच्या त्रिकोणी मैदानात होता चाफा. गर्ल्स कॉमनरूमसमोरच्या पायऱ्यांवर येऊन बसलो. समोरच्या चाफ्याला निरखीत राहिलो. या महाविद्यालयातल्या सहा वर्षांतले असंख्य प्रसंग पिंगा घालायला लागले. कॉलेजमध्ये असतानाच पुण्या मुंबईच्या अनेक नियतकालिकांतून मी नियमितपणे कथा लिहीत होतो. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने मी चक्क 'ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी' ही महाविद्यालयाच्या परिसरावर आधारित कादंबरी लिहिली.मुंबईच्या 'अर्धांगिनी' मासिकात ती तेव्हा प्रसिद्ध झालीष्ठत्यालाही आता त्रेपन्न वर्षे होऊन गेलीतष्ठ.फावला वेळ मिळेल तेव्हा चाफ्यासमोरच्या पायऱ्यांवर मी येऊन बसायचोष्ठमाझ्या कथेतील अनेक पात्र याच परिसरात मला गवसली होती.. पूर्वी घडून गेलेली गुपितं या चाफ्याने मला सांगितली होती. माझी एक कथा वाचून मॅडम म्हणाल्या होत्या ' तुम्ही मुलं फार भाबडी असता, ..मुली फार चतुर आणि व्यवहारी असतात' ष्ठतो प्रसंग आठवला अन् डोळ्यासमोर श्रीरंग आलाष्ठसहा वर्षे सोबत असलेल्या मैत्रिणीला त्याने लग्नाबाबत विचारलं, तेव्हा तिने नकार दिला. ' तू नाही तर कोणीच नाही ' या बाण्याने श्रीरंग अविवाहित राहिला.पण काळाच्या ओघात एकटेपणा असह्य व्हायला लागला..आणि पाहता पाहता त्याचा पार 'देवदास ' झाला. मला विलक्षण भरून आलं. मी उठलो. चाफ्याजवळ गेलो. त्याच्या बुंध्याशी मातीचा उंचवटा केलेला होता. कसाबसा त्यावर चढलो चाफ्याच्या बुंध्यावरून हात फिरवायला लागलो.तो स्पर्श त्यालाही जाणवला असावा..का कोणजाणे पण माझ्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहायला लागले.. आवेगाने मी त्याला कवटाळलं .त्याच्या फांदीवर डोकं ठेवलं. डोळे मिटले गेले तरी अब्द अब्द प्रसंग फेर धरायला लागले. किती वेळ गेला देव जाणे..कसल्याशा आवाजाने मी भानावर आलो.. चालक मला हाका देत होता. चाफ्याला कवटाळून अश्रू गाळणाऱ्या मला बघून तो घाबरून गेला होता.

'सर, काय झालं ? किती वेळचा शोधतो आहे' मी डोळे पुसले. चाफ्यावरून हळूवार हात फिरवला आणि बाहेर पडलो. कार नागपूर विमानतळाच्या दिशेने धावत होती.


**डॉ. सुभाष गढीकर**
पसायदान, ९६, यशवंत कॉलनी,
कारंजा लाड मो.नं. ९८५०८२४५९०

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा. त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
बुधवार, दि.८ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## बेपत्ता रुग्णाची ओळख पटविण्याचे आवाहन



**अकोला:** १ एप्रिल पासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय येथील मेडिसिन विभाग अंतर्गत वार्ड क्रमांक ३२ मध्ये एक अनोळखी रुग्ण प्रवीण मोती वय ६० वर्ष भरती आहे. ते गुजरातचा पत्ता सांगत आहे. परंतु अजूनतरी कोणीही त्यांचे नातेवाईक किंवा ओळखीचे कोणी रुग्णाची ओळख पटवण्यासाठी पुढे आलेले नाहीत. अनोळखी रुग्णाला बेशुद्ध अवस्थेत रामदास पेठ पोलीस स्टेशनच्या पोलिसामार्फत रुग्णालयामध्ये एम.एल.सी केस म्हणून उपचारासाठी दाखल करण्यात आलेले आहे.

## श्री स्वामी समर्थ केंद्रात अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन

अकोट. स्थानिक यशोदा नगर स्थित श्री स्वामी समर्थ सेवा आध्यात्मिक विकास व बाल संस्कार केंद्र येथे श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी उत्साहाचे औचित्य साधून ०८ ते १५ एप्रिल या कालावधीत अखंड नामजप सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने ०८ रोजी ग्रामदेवता सन्मान मंडल मांडणी व पूर्वतयारी, ०९ ला मंडळ स्थापना स्थापित देवता हवन, अग्निस्थापना नित्य स्वाहाकार, १० ला श्री गणेशयाग, मनोबोध याग, ११ ला चडीयाग, १२ ला श्री स्वामी याग, १३ ला श्री गीताई याग (विष्णुसहस्त्रनामावली हवन) १४ ला श्री रुद्र याग, श्री मल्हारीयाग, १५ ला बलि पूर्णाहुती श्री सत्यदत्त पूजन, देवता विसर्जन व अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाची सांगता महाआरती व महाप्रसाद इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# तेल्हारा नगर परिषदेत कर वसुली घोटाळ्याची जोरदार चर्चा

### मालमत्ता कराच्या लाखोंच्या रकमेचा अपहार झाल्याचा संशय

प्रतिनिधी ८ एप्रिल




**तेल्हारा :** तेल्हारा नगर परिषदेत कर वसुली विभागात मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराची शक्यता व्यक्त केली जात आहे. मालमत्ता कराच्या वसुलीत लाखो रुपयांचा अपहार झाल्याची गंभीर चर्चा सध्या सुरू असून, दोन कर्मचाऱ्यांवर आरोप झाले आहेत. मुख्याधिकारी यांनी गंभीर दखल घेत दोघांच्या विभागीय चौकशीचे आदेश दिल्याचे कळते.

मिळालेल्या माहितीनुसार, मार्च महिन्यात प्रलंबित मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेदरम्यान विविध कर्मचाऱ्यांवर वसुलीची जबाबदारी सोपविण्यात आली होती. मात्र, याच काळात दोन कर्मचाऱ्यांनी काही मालमत्ताधारकांकडून कराची रक्कम स्वीकारून अधिकृत पावती न देता ती परस्पर गिळंकृत केल्याचा आरोप आहे.

या प्रकारामुळे वसूल झालेली रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा न होता अपहारित झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. प्राथमिक चौकशीत हा प्रकार उघडकीस आल्याने नगर परिषद वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, संबंधित कर्मचारी हे मूळतः शिपाई पदावर कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. अशा संवेदनशील आर्थिक कामासाठी शिपाई पदावरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती का करण्यात आली, यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या प्रकरणाची गंभीर दखल घेत प्रशासनाने दोन्ही कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच, एका कर्मचाऱ्याची बदली करण्यात आल्याची माहितीही पुढे येत आहे. दरम्यान, कार्यालय अधीक्षकांनी या प्रकरणाबाबत अद्याप अधिकृत माहिती नसल्याचे सांगितले, तर मुख्याधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न निष्फळ ठरला.जर करदात्यांकडून वसूल केलेली रक्कम अपहारित झाल्याचे सिद्ध झाले, तर हा प्रकार केवळ शिस्तभंगापुरता मर्यादित न राहता फौजदारी गुन्ह्याच्या चौकटीतही येऊ शकतो. त्यामुळे दोषींवर कठोर कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या घटनेमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, 'कर भरूनही पावती मिळत नाही, मग पैसा गेला कुठे?' असा सवाल उपस्थित केला जात आहे. पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# मुर्तिजापुरात सन्मित्र अर्बन को-ऑप बँकेचे उद्घाटन; आमदार हरीश पिंपळे यांची प्रमुख उपस्थिती



प्रतिनिधी ८ एप्रिल

**मुर्तीजापुर :** मुर्तीजापुर शहरातील बीटी मॉल येथे सन्मित्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. (अकोला) या नवीन शाखेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या उद्घाटनाचा मान लहान चिमुकल्या सॉझी प्रशांत हजारी आणि भव्या अमोल प्रजापती यांच्या हस्ते करण्यात आला, ज्यामुळे कार्यक्रमाला एक विशेष आकर्षण प्राप्त झाले.

या कार्यक्रमाला मुर्तीजापुर मतदारसंघाचे आमदार हरीश पिंपळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उद्घाटनानंतर बँकेकडून उपस्थित ग्राहक, शेतकरी, दूध विक्रेते तसेच व्यापारी वर्ग यांना बँकेच्या विविध सेवा, योजनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. ग्रामीण आणि शहरी भागातील आर्थिक व्यवहार सुलभ करण्यासाठी ही शाखा महत्त्वाची ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमास उपाध्यक्ष रमेश चौधरी, डॉ. दीपक केळकर, सुभाष केळकर, भूषण जाजू, सतीश अघडते, मुर्तीजापुर शाखा समिती संचालक प्रशांत हजारी, श्यामसुंदर वर्मा, अमोल प्रजापती, डॉ. प्रशांत अवघाते, सागर कोरडे, कोमल तायडे यांच्यासह शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी आणि दूध विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार हरीश पिंपळे यांनी आपल्या भाषणात बँकेच्या कार्याबद्दल शुभेच्छा देत, गजानन महाराज यांची प्रतिमा भेट स्वरूपात प्रदान केली.

तसेच बँकेच्या भविष्यातील योजना आणि ग्राहकहिताच्या विविध विषयांवरही चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीईओ धनराज पाटणकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन रमेश चौधरी यांनी मानले. मुर्तीजापुरात नव्याने सुरू झालेली ही बँक स्थानिक नागरिकांसाठी आर्थिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# संतांच्या नावाने प्राप्त ओळखच श्रेष्ठ- हभप भरत महाराज

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोला:** जगात व्यक्तीची ओळख ही अनेक प्रकाराने होत असते. स्वतःच्या नावाने होणारी ओळख ही सर्वार्थाने अव्वल असते. त्याचप्रमाणे पित्याच्या नावाने आलेली ओळख ही दुय्यम प्रतीची, सासऱ्याच्या नावाने आलेली ओळख ही तृतीय श्रेणीची व पत्नीच्या नावाने आलेली ओळख ही कनिष्ठ प्रतीची असते, मात्र संताच्या नावाने आलेली ओळख ही सर्वात श्रेष्ठत्व असते. म्हणून लौकिक जगतात अशी संतांच्या माध्यमातून ओळख निर्माण करण्याचा हितोपदेश हभप भरत महाराज चौधरी यांनी केला.श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बिजोत्सव सेवा समिती, गायत्री नगर कौलखेड च्या वतीने गायत्री नगरच्या प्रांगणात हभप प्रशांत महाराज ताकोते यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या किर्तन



महोत्सवात भुसावळ येथील कीर्तनकार हभप भरत महाराज चौधरी यांनी कीर्तनाचे द्वितीय पुष्प सादर केले.तुकोबांच्या ठअबोलणे मरोनिया जिणे । असोनि नसणे जनी आम्हां,भोगी त्याग जाला संगीच असंग, तोडियेले लाग माग दोन्ही,तुका म्हणे नव्हे दिसतो मी तैसा, पुसणे तें पुसा पांडुरंगाठ या अभंगावर भरत हभप चौधरी यांनी सुंदर व भक्तीपूर्ण विवेचन केले.ते म्हणाले, तुकोबांनी या अभंगात आपल्या अलौकिक स्वरुपाचे वर्णन केले आहे.संत स्वतःचा परिचय करून देत नाहीत. मग तुकोबांनी आपल्या स्वरूपाचे वर्णन का केले.हे तर मरणावरून ही कनिष्ठ आहे.मग त्यांनी याचे सुंदर वर्णन का केले.

याची सुंदर व्याख्या त्यांनी या कीर्तनात केली.संत भक्तांचे चरित्र वर्णन करतात.त्यांचे उत्सव साजरे करतात.तेच वंदनीय ठरत असल्याचे हभप चौधरी महाराज यांनी यावेळी सांगितले.तुकोबांच्या भावना लक्षात घेणे गरजेचे आहे. जीवाला भगवन्ताची प्राप्ती करून घ्यावयाची असेल तर संताशिवय उपाय नाही.संत चरित्र हे समाजाला दिलेला शब्द असून त्याचे पालन संत वर्ग योग्य पध्दतीने करीत असतात.असे हभप चौधरी यांनी यावेळी सांगितले.सर्वप्रथम समितीच्या वतीने हभप भरत महाराज यांचे स्वागत करण्यात आले.

# वसंत बहार सुरांच्या मैफिलीने रसिकांची मने जिंकली

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोट:** अकोट शेतकरी मोटर्स दर्यापूर रोड सांस्कृतिक व संगीत क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवणाऱ्या तसेच नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या अकोट मेलोडी ग्रुप वतीने 'वसंत बहार' या सुरांच्या मैफिलीने रसिकांची मने जिंकली. या मैफिलीत अनेक सदाबहार हिंदी व मराठी गीते सादर करण्यात आली.मार गई मुझे 'तेरी जुदाई,'हुस्न पहाडों का','एक तेरे ही चेहरे पर', 'प्रियतमा प्रियतमा','घुंगट की आड से','हृदयी वसंत फुलताना' यांसारख्या अनेक गाण्यांनी वातावरण भारावून गेले. कार्यक्रमाची विशेषता म्हणजे प्रसिद्ध गायिका हेमा




जोशी (अकोला) यांनी मेलोडी ग्रुपच्या सदस्यां सोबत युगल गीते सादर करीत प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले.कार्यक्रमाचे बहारदार व रंगतदार सूत्रसंचालन प्रविण पुंडगे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेलोडी ग्रुपचे अध्यक्ष योगेश वर्मा,सचिव भास्कर वानखडे, नंदुभाऊ शेगोकार, हिम्मत दंदी, कोषाध्यक्ष अरुण सांगळूदकर तसेच व्यवस्थापक कैलास बोरकुटे, शेतकरी मोटर्स चे अजिंक्य नाथे, अनिल खलोकार, दर्शन ठाकूर यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी नंदुभाऊ शेगोकार, संदिप ढोक,मिलिंद तेलगोटे, पवन पातूरकर, ओमप्रकाश डेबला ,अनंत काळे,विजय भोरे,सुनिल धुळे,आदित्य गुप्ता, किरण गुहे,योगेश वर्मा,दीपक तळोकार,स्वप्नील आढे,भास्कर वानखडे,मोहन सपकाळ, कन्हैया

### ♦ मेलोडी ग्रुप चा स्तुत्य उपक्रम

गौर,डॉ.विशाल इंगोले,आशिष बारबदे,गजानन तायडे,श्याम राऊत,हिम्मत दंदी, कैलास बोरकुटे,आनंद भोरे, अरुण सांगळूदकर,प्रताप सोळंके,दिगंबर वणारे या गायकांनी आपल्या सुमधुर आवाजात गीते सादर केली.

कार्यक्रमास अकोट शहरातील गणमान्य लोकांसोबत मोठ्या संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते. बहारदार रंगतदार सूत्रसंचालन बहारदार प्रवीण पुंडगे यांनी पार पडले वसंत बहार ला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थित रसिक श्रोत्यांनी मेलोडी ग्रुप ची भरभरून स्तुती करत कार्यक्रमाचा आनंद घेतला.

# 11 वर्षानंतर फौजदारी प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता

प्रतिनिधी ८ एप्रिल


**मुर्तीजापुर :** ११ वर्ष चाललेल्या फौजदारी प्रकरणात अखेर आरोपी अरविंद हिम्मतराव अनभोरे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. हा महत्त्वपूर्ण निकाल ३० मार्च २०२६ रोजी न्यायाधीश ए. जी. तांबोळी यांनी दिला. या प्रकरणात आरोपीवर एका महिलेच्या घरात जबरदस्तीने घुसखोरी करून तिला मारहाण व दरोड्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गंभीर आरोप ठेवण्यात आले होते. मात्र, बचाव पक्षाचे विधिज्ञ ॲड. सचिन वानखडे यांनी ठोस युक्तिवाद करत अभियोग पक्षाची बाजू खोडून काढली.

फिर्यादीच्या साक्षीत व एफ आय आर मध्ये विसंगती दिसली. आरोपी अनोळखी असताना ओळख परेड न घेणे, पंच साक्षीदार व स्वतंत्र साक्षीदारांचा अविश्वसनीय व विरोधाभासी पुरावा, तपास प्रक्रियेमधील गंभीर त्रुटी व उणीवा, वैद्यकीय पुरावाही निर्णायक नसल्याचे स्पष्ट झाले.

या सर्व मुद्द्यांमुळे अभियोग पक्षाचा दावा संशयास्पद ठरतो, हे ॲड. वानखडे यांनी ठामपणे सिद्ध केले. आरोपीविरुद्धचा गुन्हा संशयाच्या पलीकडे सिद्ध झालेला नाही.' पुराव्यातील विसंगती व तपासातील त्रुटी गंभीर आहेत. सर्व बाबींचा सखोल विचार करून न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात ॲड. सचिन वानखडे यांनी प्रभावी मांडणी केल्याची चर्चा आहे. २६.०३.२०१४ रोजी दुपारी फिर्यादी घरी असताना एक अनोळखी ईसम अंदाजे ४० वर्ष घराजवळ आला. सदर इसमाने फिर्यादीस पाणी मागितले. त्यानंतर फिर्यादीने पाणी दिले तेव्हा त्याने फिर्यादीस तुझ्या गळ्यातील व कानातील सोन्याचे आहे का बेंटेक्सचे आहेत असे विचारले. तेव्हा फिर्यादी म्हणाली तुम्ही कशाला विचारता. तेव्हा सदर इसमाने खिशातील दगड काढला व तो एकदम फिर्यादीच्या डोक्यावर मारला. चाकू काढला व फिर्यादीला मारण्यास गेला असता फिर्यादीने आरडाओरड केली. तेव्हा इसम घरातून पळून जाताना कॉलनीतील काही लोकांनी घराबाहेर त्याला पकडले. त्या नंतर फिर्यादी ने पोलिस स्टेशन मुर्तिजापूर येथे सदर इसमा विरुध्द तक्रार दिली.

# जनगणना प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ

### ♦ तालुका प्रशिक्षण सत्र २७ एप्रिल ते ८ मे दरम्यान




प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोला :** जनगणना क्षेत्रीय प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ आज नियोजन भवनात झाला. जनगणनेच्या कार्यासाठी तीन हजारावर मनुष्यबळ लागणार असून, त्यानुसार नियुक्त्या करण्यात आल्या आहेत, तसेच प्रशिक्षण सत्रांना प्रारंभ झाला आहे.

जनगणना संचालनालय व जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी अकोलाच्या वतीने जनगणना २०२७ क्षेत्रीय प्रशिक्षक यांच्या प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ झाला. निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी गजेंद्र मालठाणे, जिल्हा माहितीविज्ञान अधिकारी अनिल चिंचोले, बाळापूर तहसीलदार वैभव फरतारे, उपायुक्त प्रशासन मनपा दिलीप जाधव, अधीक्षक श्याम धनमने यांच्या आदी उपस्थित होते. मास्टर ट्रेनरकडून क्षेत्रीय प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणानंतर क्षेत्रीय प्रशिक्षक हे तालुक्याच्या ठिकाणी प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देणार आहेत. तालुका प्रशिक्षण सत्रे २७ एप्रिल ते ८ मे दरम्यान होतील. जिल्ह्यातील सर्व तालुके, नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील जनगणनेसाठी २ हजार ६४६ प्रगणक, तसेच ४४४ पर्यवेक्षक काम करतील.

# पोळी खाण्याच्या प्रयत्नात अडकलेल्या गायीची सुटका



प्रतिनिधी ८ एप्रिल

**हिवरखेड:** येथील विकास मैदानातील एका वाडीत मोकाट गायी फिरत असताना तिने एका लोखंडी नागरटीवर असलेली पोळी खाण्याचा प्रयत्न केला असता, त्या मध्ये गायीचा गळा फसला. गायीचा जीव धोक्यात आला, गायीला वाचविण्यासाठी सैरावैरा पळून नागरिकांनी धाव घेतली. यामध्ये हिंदू मुस्लिम एकात्मेचे दर्शन घडवून आले, शेवटी गायीची काही वेळाने त्या लोखंडी नागर्टी मधून सुटका झाली, यात चूक कोणाची सांगता येत नाही मात्र एवढे नक्की सागता येणार , देव तारी त्याला कोण मारी '

# गाजीपूर, गोंडी संस्कृती संमेलन तथा आदिवासी मेळावा संपन्न

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोट :** अकोट कुवारा भिवसन गाजीपूर येथे गोंडी संस्कृती संमेलन तथा आदिवासी मेळावा संपन्न झाला. गोडी संस्कृती नुसार आधीनाथ कुवारा भिवसन हे पारधी व टाकूनकार समाजाचे कुलस्वामिनी आराध्य दैवत असून यांची सालाबाद यात्रेनुसार पुजा अभीषक तथा संस्कृती परंपरागत समाज बांधवांच्या उपस्थितीत पुजन करण्यात आले.

यात्रा महोत्सव मेंळाव्याला प्रमुख पाहुणे व अध्यक्षस्थान विकास प्रकल्प अधिकारी पांडुरंग चंदन हे लाभले. तसेच कार्यक्रमाचे आयोजक अजाबराव उईके तसेच प्रमुख पावणे मार्गदर्शक अकोला कार्याध्यक्ष डिगांबर सोळंके वस्ताद अकोट,प्रा.अक्षत उईके माजी जि.प.सदस्य गजानन डाफे ,नीतूताई अक्षत उईके यांनी मार्गदर्शन केले. दरवर्षीनुसार याही वर्षी यात्रेसाठी गोळा केलेल्या वर्गणी मधून उरलेल्या रकमेमधून संस्थांमध्ये उपयोगी येणाऱ्या भांड्यांच्या वस्तूंचा सट आणण्यात




आला व मंदिरातील बांधकाम चे काम करण्यात आले मंदिर संस्थांमध्ये महत्त्वाचा सुख सुविधांचा अभाव हा पुढील कार्यक्रमात युवा विकास पंचमंडळ हे भरून काढतील असे व आणखी प्रगती कशी होईल याकडे आणखी वाटचाल करण्यात येईल उपस्थित त्यांनी नमूद केले सर्व यात्रेत सहभागी समाजबांधव व पदाधिकाऱ्यांनी महाप्रसादाचा सर्वांनी मोठ्या संख्येत लाभ घेतला यावेळी शंकर मडावी ,प्रकाश उईके, सतीश सयाम, भारत पधरे, नरेंद्र सिरसाम अध्यक्ष,महिला बचत गटाचे अध्यक्ष कल्पना खंडाते, राधा शिडाम, भीमराव उईके, राजू वरटी, विठ्ठल उईके, सहदेव उईके , बापूराव भलावी तुरखेड, कन्यालाल भोसले, बाळूभाऊ उईके, अकोलखेड भास्कर मसराम, गुलाब वरठी, बंडू उईके, भुमक येमुना, टेकाम भुमक, मिना विलास गेडाम, ललीताताई ऊईके, सिधुताई अजाब उईके, हेमाताई हनुमंत मरसकोहे, अनीताताई टेकाम, बळीराम मसराम, रमेश पुसाम, मगेश मरसकोल्हे, यांच्यासह कार्यक्रमाला बहुसंख्येने अनेक आदिवासी समाजातील व जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व समाज बांधव उपस्थित होते.हा मेळावा नियोजित संपन्न करण्यासाठी विठ्ठल मडावी व योगेश उईके यांच्या टीमने अतोनात प्रीक्षाम घेतले. या यात्रा महोत्सवाला नियोजित संपन्न करण्यासाठी जय वळेखन आदिवासी विकास संघ चे पदाधिकारी सर्व पंचक्रोशीतील समाजबांधव यांनी उपस्थिती लावून कार्यक्रम यशस्वी केला.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६
माँ. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा
इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९,
९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## अमिषाला बडी पडू नका

■ बॅका, पतसंस्थेकडून गुंतवणुकदारांना जास्त व्याज देण्याचे आमिष दाखविण्यात येते. नंतर मात्र व्याज देण्यात टाळाटाळ करण्यात येतो. त्यामुळे त्यांची फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यमुळे नागरिकांनी आमिषाला बळी पडू नका असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

## पोलीस व पत्रकारांनाही चुना

■ शिस्तीचे खाते असलेले व गुन्हेगारांना धडा शिकविण्याची जबाबदारी असलेल्या पोलिस खात्यातील अनेक पोलीस कर्मचारी व त्याच्या कुटुंबातील सदस्यांनाही या महाठगांनी चुना लावला आहे. एवढेच नव्हे तर लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या मिडीया क्षेत्रातील अनेक पत्रकारांनाचीही फसवणूक केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

# 15 हजार गुंतवणुकदारांची 70 कोटीने फसवणूक

## वित्तीय संस्थासह निधी, बॅक, पतसंस्थेत घोटाळा

प्रतिनिधी ८ एप्रिल

राहुल वासनिक

**यवतमाळ :** कमी वेळात जास्त पैसा मिळाला पाहिजे अशी सर्वसामान्यासह नोकरदार, सेवानिवृत्त झालेल्या नागरिकांची अपेक्षा आहे. अशाच प्रकारातून अनेक बॅक, पंतसंस्था, निधी, मल्टीस्टेट, शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक केली आहे. यामध्ये अनेकांनी जास्त व्याज दराचे आमिष दाखविण्यात येत आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील १५ हजार गुंतवणूकदारांची ७० कोटी रुपयाने फसवणूक झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. सन २०२२ ते २०२६ या कालावधीत यवतमाळ जिल्ह्यात ९ फसवणूकीचे गुन्हे पोलीस दप्तरी नोंद झाले आहे.

अलीकडच्या काळात निधी, पंतसंस्था, बॅक, मल्टीस्टेट को-ऑप. बॅकांचे पिक आले आहे. यामध्ये गुंतवणुक केल्यास जास्त व्याज परतावा देण्याचे आमिष दाखविण्यात येत आहे. या माध्यमातून अनेक नागरिकांना लाखो रुपयाची गुंतवणुक करायला लावुन त्यांची फसवणूक केल्याचे अनेक प्रकरण जिल्हयात समोर आले आहे. सन २०२२ ते २०२६ चार वर्षात एकुण ९ गुन्हे दाखल झाले आहे.

पहिला गुन्हा २०२२ मध्ये अवधूतवाडी पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे. कलकाम रियल इन्फा. लि. या कंपनीमध्ये ३८१ गुंतवणूकदारांने गुंतवणूक केली होती. त्याची ६ कोटी ५६ लाख रुपयाने फसवणुक झाल्याचे समोर आले आहे. एमपीडीए कायद्या अंतर्गत कंपनीची रत्नागिरी, ठाणे येथील संपत्ती जप्त केली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक महागाव येथे १ कोटी ८७ लाख रुपयाची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. यामध्ये महागाव पोलीस ठाण्यात ७ आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिसरी घटना टुरिझम संदर्भातील असून, भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालया अंतर्गत येणा-या विविध योजनेत गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल अशी आमिष दाखविण्यात आली. यामध्ये गुंतवणूकदारांची १ कोटी ४४ लाख रुपयाने गंडा घालण्यात आला. यामध्ये मिरा फडणविस व अनिरुद्ध होशिंग यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तर यवतमाळ येथील बाबाजी दाते महिला बॅकेत ३७ हजार ५०० च्यावर ठेविरारांनी २४२ कोटी




रुपयाची गुंतवणूक केली आहे. या बॅकेतील घोटाळा समोर आला असून, अवधूतवाडी पोलिसांनी २०५ आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या पैकी अनेक आरोपींना अटक करण्यात आली. तर आरोपींचा जामिन मंजुर करण्यात आला आहे. दरम्यान पाच लाख रुपये रक्कम गुंतवलेल्या ठेविदारांची रक्कम परत देण्यात आली आहे. तर सात हजार ग्राहकांचे पैसे परत द्यायचे असून, त्यांनाही पैसे परत देण्याची प्रक्रीया सुरु असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.

उमरखेड येथील राजस्थानी मल्टीस्टेट क्रेडीट को.-ऑप. शाखेत ९० गुंतवणूकदारांची ४ कोटी ४७ लाखाने फसवणुक झाल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी उमरखेड व बिटरगाव अशा दोन पोलीस ठाण्यात १४ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.तर दिग्रस येथील जनसंघर्ष निधी मर्या. मध्ये २९०० जणांनी ३५ कोटी रुपयाची गुंतवणुक केली होती. यामध्ये दिग्रस पोलीस ठाण्यात सात आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे. टि डब्ल्यु जे मध्ये शेअर मार्केटच्या माध्यमातून ८४० गुंतवणूकदारांची ३ कोटी रुपयाची फसवणूक केली आहे.

याप्रकरणी चार आरोपी विरुध्द अवधुतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. नेर येथील अष्टविनायक पतसंस्थेत १९ पेक्षा जास्त गुंतवणुकदारांची २८ कोटी रुपयाची गुंतवणुक केली आहे. तर नुकतीच कृषी कंपनीने पावने चार कोटी रुपयाने फसवणुक केल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणी अवधुतवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल झाला आहे.

### सेवानिवृत्त कर्मचा-यांची फसवणूक

■ शासकीय-निम शासकीय कार्यालयातून सेवानिवृत्त कर्मचा-यांना म्हातारपणात आयुष्य जगण्यासाठी २०-३० लाख रुपये देण्यात येते. या रक्कमेवर त्यांनी डोळा ठेवुन सेवानिवृत्त कर्मचा-यांना जास्त व्याजाचे आमिष दाखवुन त्यांच्याकडून लाखों रुपयांच्या ठेवी घेण्यात असल्याचे समोर आले आहे. मात्र मुदत संपल्यानंतर पैसे देण्यास टाळाटाळ करीत असल्याची बाबही पोलीस तपासात पुढे आली आहे.

### हम नही सुधरेंगे

■ जिल्ह्यात गेल्या चार-पाच वर्षात वित्तीय संस्थेमध्ये घोटाळा, फसवणूकीचे ९ गुन्हे पोलीस दप्तरी नोंद झाले आहे. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हे दाखल केले असून, अनेक आरोपींना बेड्या ठोकल्या आहे. सदर घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. तरीही, नागरिकांनी या अनुभवातून शिकण्याचे प्रमाण कमी असल्याने "हम नही सुधरेंगे" अशी वृत्ती दिसून येत आहे.



■ **यवतमाळ :** टेंबुर आणि चारोळी या रानमेव्याची सध्या ग्रामीण भागात मोठी धूम पाहायला मिळत आहे. उन्हाळा सुरू होताच जंगलातील या नैसर्गिक देणग्या बाजारात दाखल होतात आणि लोक त्यांची आतुरतेने वाट पाहतात. टेंबुराचे गोड, पौष्टिक फळ आणि चारोळीच्या बियांचा पारंपरिक पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. झाडतोडीमुळे या रानमेव्याची उपलब्धता कमी होत असली तरीही मजूर वर्ग जंगलातून हे फळ गोळा करून शहरात विक्री करताना दिसतो. या विक्रीतून त्यांना चांगला आर्थिक आधार मिळतो आणि त्यांच्या उपजीविकेला हातभार लागतो.

## वऱ्हाड साहित्य मंचाचा उपक्रम : सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव

प्रतिनिधी ८ एप्रिल

**नेर :** स्वर्गीय ज्येष्ठ पत्रकार नारायणराव वंजारी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वऱ्हाड साहित्य मंचाच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. दारव्हा रोडवरील वनविभागाच्या रोपवाटिकेत आयोजित कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. विलास माहुलकर होते. उद्योजक गजानन नागपूरे, जीवन बोरकर, रमेश कहाते, पत्रकार उमेश इंगोले, प्रा. गणेश भारती हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्ष सुनीता जयस्वाल, नगरसेवक पवन जयस्वाल, उपाध्यक्ष शिवानी गुगलीया, गौरव नाईकर, सोनाली गुल्हाने यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. दिव्यांग संघटनेचे गणेश ठाकरे, सुरेश देशमुख (अमरावती), पक्षीमित्र किशोर चावरे, विजय चुंभळे, अनिता पानबुडे, शोभा कोठारी, गायक संजय चतूरकर, हरीश देऊळकर आदींचा शाल, सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

नारायणराव वंजारी यांच्या पत्रकारितेतील कार्याचा उल्लेख करत त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घेण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले. सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान केल्याने समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असे प्रतिपादन अध्यक्ष प्रा. डॉ. विलास माहुलकर यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रफुल आकोलकर यांनी केले. संचालन कल्याणी चौधरी यांनी केले, तर सूत्रसंचालन निलेश वंजारी यांनी केले. आभार संजय राऊत यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रविण चांदोरे, संतोष ढेंगे, संतोष जयस्वाल, महेश भोयर, सागर माने, पंकज खानजोडे, प्रकाश गडेकर, दिलीप आंबेकर, राजेश सिंगवी, आशा वंजारी, आचल वंजारी, प्रिती आकोलकर, शिल्पा आकोलकर, दुर्योधन इंगोले, अविनाश चव्हाण आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महिलांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## महिलेवर कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला

प्रतिनिधी ८ एप्रिल

**उमरखेड :** देवसरी येथील एका घरात उसनवारीच्या पैशावरून झालेल्या वादातून इसमाने कु-हाडीने वार करून महिलेवर प्राणघातक हल्ला चढविला. सीमा देवसरकर (वय 32, रा. देवसरी) असे जखमी महिलेचे नाव आहे. तर आरोपी राजेश पवार (वय 32, रा. देवसरी) असे आरोपीचे नाव आहे. पोलिस सूत्रांनुसार, महिलेने मागील महिन्यात आरोपीला 300 रुपये उसनवारी म्हणून दिले होते. पैसे मागितल्यावर वाद झाला. सायंकाळी सुमारे 7 वाजता आरोपीने तिला डोक्यावर, डाव्या कानावर व



डाव्या कमरेवर कुऱ्हाडीचे सपासप वार केले. महिला गंभीर जखमी अवस्थेत उमरखेड रुग्णालयात दाखल झाली असून तिथून नांदेड शासकीय रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला गेला. जमादार नरेंद्र पुंड यांनी नांदेड येथे तिचा जबाब नोंदविला. या प्रकरणाचा तपास ठाणेदार शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार नरेंद्र पुंड करीत आहे.

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अपुरा निधी; कंत्राटदारांचा संताप

प्रतिनिधी ८ एप्रिल

**पुसद :** पुसद येथील सार्वजनिक बांधकाम विभाग (सा.बा.) कडून मार्च अखेर सुमारे १२० कोटी रुपयांच्या देयकांची मागणी सादर केली गेली होती. मात्र, प्रत्यक्षात केवळ १४.५० कोटी रुपयांचेच वितरण करण्यात आल्यामुळे कंत्राटदारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

कंत्राटदारांची तक्रार आहे की, वर्षभर स्वतःच्या आर्थिक जोखमीवर काम करणाऱ्यांना केवळ ८ ते १० टक्के रक्कम मिळाल्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागले आहे. त्याचबरोबर, देयक वितरणामध्ये भेदभाव होत असल्याचे कंत्राटदारांचे म्हणणे आहे. जुन्या प्रलंबित देयकांच्या कंत्राटदारांना



प्राधान्य न देता, नव्या कंत्राटदारांना समान देयक दिले जात असल्याचा आरोप केला जात आहे."कोणी उपाशी तर कोणी तुपाशी" अशी स्थिती असून, यामुळे कंत्राटदारांमध्ये असंतोष पसरला आहे. कंत्राटदार, मजूर सोसायट्या आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी मंगळवारी सकाळी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर एकदिवसीय साखळी उपोषण केले. या आंदोलनात मोठ्या संख्येने कंत्राटदार पदाधिकारी आणि सदस्य सहभागी झाले. कंत्राटदार महासंघाचे प्रतिनिधी म्हणाले की, देयक तात्काळ दिले गेले नाहीत तर महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाच्या वतीने काम बंद आंदोलन सुरू करण्यात येईल. कंत्राटदारांनुसार, सरकारी धोरणांमुळे त्यांना नवा काम सुरू करत असताना त्यांचे देयक लांबणीवर टाकले जात आहे. त्यांचा आरोप आहे की, प्रलंबित देयकाच्या वाटपात न्याय न मिळाल्यामुळे व्यवसायावर गंभीर परिणाम होऊ शकतो. या संकटाच्या गंभीरतेसाठी शासकीय स्तरावर तातडीने योग्य निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

## अडगाव येथील साजिया पठाणची पोलीस दलात निवड

प्रतिनिधी ८ एप्रिल

**नेर :** शेतमजूर करणाऱ्या आई-वडिलांचे पोटी जन्म घेतलेल्या अडगाव येथील साजिया रसुलखा पठाण हिची यवतमाळ पोलीस दलात निवड झाली आहे.अत्यंत कठीण आर्थिक परिस्थिती सोबत झुंज देत तिने हे यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे पहिल्याच प्रयत्नात तिने यशाला गवसणी घातली आहे.

नेर येथील नेहरू कला वाणिज्य महाविद्यालयातून वाणिज्य शाखेतून पदवीधर झाली आहे. एक वर्षापूर्वी स्पर्धा परीक्षेसाठी तिने अमरावती गाठले. नियोजनबद्ध अभ्यास आणि मैदानावरील सातत्य याचे बळावर तीने



हे यश प्राप्त केले आहे.

तिच्या या यशामुळे मजुरी करून रात्रंदिवस घाम गाळणाऱ्या आई वडिलांचे स्वप्न साकार झाले असून तिच्यावर परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पावसाळ्यापूर्वी वीजपुरवठ्यावर लक्ष; उपविभागीय अधिकारी कार्यालयात आढावा बैठक

प्रतिनिधी ८ एप्रिल

**उमरखेड :** येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर उमरखेड मतदारसंघात वीजपुरवठा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसंबंधी व्यापक तयारी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयात महावितरण तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसह सविस्तर आढावा बैठक पार पडली.

बैठकीत सोलर प्रकल्पांची कामे, प्रलंबित वीजकामांची गती वाढवणे आणि तातडीने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

वारंवार होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या अडचणी कायमस्वरूपी सोडविण्यासाठी



अधिकाऱ्यांना कठोर सूचना देण्यात आल्या.

पावसाळ्यात वादळी वारे व मुसळधार पावसामुळे वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी झाडांची छाटणी, धोकादायक फांद्या हटवणे, वीजतारांचे मजबुतीकरण व देखभाल या सर्व कामांवर युद्धपातळीवर लक्ष केंद्रित करण्याचे आदेश दिले. तसेच आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देशही दिले.

बैठकीत उपविभागीय अधिकारी सखारामजी मुळे, जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, मा.आ. विजय खडसे, तहसीलदार राजेश सुरडकर, उमरखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय कुरवाडे, महावितरणाचे उपअभियंता अंबाडकर, एस. जाधव व अन्य अधिकारी उपस्थित होते.

अधिकाऱ्यांच्या मते, पावसाळ्यात शेतकरी, नागरिक आणि वीज ग्राहक कोणत्याही प्रकारच्या त्रासाशिवाय सुरक्षित राहतील, तसेच प्रशासन पूर्ण क्षमतेने सज्ज राहील.

प्रत्येक तक्रारीवर त्वरित आणि प्रभावी कार्यवाही होईल, असा विश्वास बैठकदरम्यान व्यक्त करण्यात आला.

## मुकूटबन ग्रा.पं.वर आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप

### हाधिकाऱ्यांकडे तक्रार

प्रतिनिधी ८ एप्रिल

**झरी जामणी :** तालुक्यातील मुकूटबन ग्रामपंचायतीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहार व मनमानी कारभाराच्या विरोधात सौ. बबीता पंकज मुद्दमवार यांनी 6 एप्रिल 2026 रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे. लोकशाही दिनाच्या निमित्ताने तक्रार करताना, त्यांनी ग्रामपंचायतीतील अनेक अनियमिततांचे व गैरव्यवहारांचे उघडकीस आणले आहेत.

तक्रारीनुसार, मागील काही वर्षांपासून मुकूटबन ग्रामपंचायतीत शासकीय योजनांचा योग्य वापर न होण्याचे आरोप करण्यात आले आहेत. सौ. बबीता मुद्दमवार यांच्या म्हणण्यानुसार, गावातील सामान्य नागरिकांना योजनांचा लाभ मिळत नसल्याचे स्पष्टपणे सांगितले आहे. यासाठी लाभ मिळवण्यासाठी लाच देणे अनिवार्य असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

तसेच, ग्रामपंचायतीतील सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडून मनमानी कारभार केला जात असल्याचे त्यांनी सांगितले आहे. अनेक वेळा गटविकास अधिकारी झरी जामणी यांच्याकडे तक्रारी केल्यास फक्त आश्वासनं देण्यात आली, परंतु प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या कारभारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

सौ. बबीता मुद्दमवार यांनी




तक्रारीसोबत संबंधित कागदपत्रे सादर केली आहेत आणि संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे. यासोबतच, ग्रामपंचायतीच्या कारभारावर तात्काळ नियंत्रण ठेवून पारदर्शकता आणण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली आहे.

तक्रारीला प्रशासनाने दखल घेत ठोस पावले उचलली नाहीत, तर उच्च स्तरावर आंदोलन छेडण्याचा इशारा अर्जदाराने दिला आहे. लोकशाही दिनाच्या निमित्ताने मांडलेल्या या तक्रारीमुळे जिल्हा प्रशासनासमोर ग्रामपंचायतीतील कारभाराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# शासकीय तूर, हरभरा खरेदी बंद ; शेतकरी संतप्त

प्रतिनिधी ८ एप्रिल



**अमरावती :** कृषी पणन मंडळ Maharashtra State Agricultural Marketing Board पुणे तर्फे जिल्ह्यातील शासकीय तूर व हरभरा खरेदी केंद्र गेल्या पंधरा दिवसांपासून बारदाना नसल्याचे शुल्लक कारण दाखवून बंद ठेवण्यात आल्याने संतप्त तूर व हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी Prakash Sable यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना स्पष्ट इशारा देत सांगितले की, तूर व हरभरा खरेदी केंद्र तात्काळ सुरू करण्यात यावे, अन्यथा तूर-हरभरा उत्पादक शेतकरी भरलेल्या पोत्यांसह ट्रॅक्टर जिल्हाधिकारी कार्यालयात आणून सोडेले.

यासंदर्भात सन्माननीय जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक भूमिका घेत तीन ते चार दिवसांत हरभरा व तूर खरेदी केंद्र सुरू होईल, असे आश्वासन दिले. याप्रसंगी दादाराव कडू, अमित कुचे,सुरज पवार, विनोद केचे, नितीन केनकर, विजयराव कडू, बाबुराव उभाड, सौरभ देशमुख, सुनील पटोळे, गजानन भगत, आशिष मंडाले तसेच वराड भूमी कृषी कंपनी, कृषी सागर, बेलोरा फार्मर प्रोड्यूसर कंपनी, एकविरा फार्मर कंपनी, कृषिराज फार्मर कंपनी, ॲग्री केअर फार्मर कंपनी आणि दिव्ययोगा फार्मर कंपनीचे सन्माननीय संचालक उपस्थित होते.

# सोने – चांदीच्या दागिन्यांच्या आयातीवर कडक लगाम , परवानगी लागणार

## भारताची सोन्याची आयात तब्बल २८.७३ टक्क्यांनी वाढून ६९ अब्ज डॉलर्सवर

- भारताला सोन्याचा मोह, आयातीत ७१९ टक्क्यांची अफाट वाढ
- सोने आयातीमुळे देशाची व्यापारी तूट वाढली
- सोने दीड लाखावर, तरी खरेदी जोरात



**अमरावती :** युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत किमती प्रचंड वाढलेल्या असतानाही भारतात मात्र सोन्याच्या आयातीत मोठी वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या ११ महिन्यांत म्हणजेच एप्रिल - फेब्रुवारी २०२५-२०२६ मध्ये सोन्याची आयात तब्बल २८.७३ टक्क्यांनी वाढून ६९ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. वाणिज्य मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. सोन्याच्या आयातीत या प्रचंड वाढीचा थेट परिणाम देशाच्या अर्थ व्यवस्थेवर झाला असून व्यापार तुट वाढून ३१०.६० अब्ज डॉलर्स झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षात याच काळात ही तूट २६१.८० अब्ज डॉलर्स इतकी होती. सोन्याच्या वाढत्या आयातीमुळे चालू खात्यातील तुटीवर मोठा दबाव निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सध्या राष्ट्रीय राजधानीत सोन्याचा दर १० ग्रॅममागे सुमारे १ लाख ५३ हजार ८०० रुपये अर्थातच सर्व करांसह इतका उच्च स्तरावर आहे. केवळ फेब्रुवारी महिन्यात स्वीतझ स्वीतझरलंडकडून होणाऱ्या आयातीत ७१९ टक्क्यांची अफाट वाढ नोंदवण्यात आली आहे. रिफायनिंग हब असल्याने हा पुरवठा सुरु आहे. चीननंतर भारत हा सोन्याचा दुसरा सर्वांत मोठा ग्राहक असून, दागिन्यांच्या मागणीमुळे ही आयात केली जाते. एकूण आयातीत सोन्याचा वाटा आता ५ टक्क्यांच्या पुढे गेला आहे. केंद्र सरकारने सोने, चांदी आणि प्लॅटिनम दागिन्यांच्या आयातीसंदर्भात मोठा धोरणात्मक बदल केला असून, ही आयात आता ’ मुक्त ’ श्रेणीतून काढून ’ मर्यादित ’ श्रेणीत टाकण्यात आली आहे. यामुळे आयातदारांना आता प्रत्येक आयातीसाठी विशेष परवाना अर्थातच लायसन्स घ्यावा लागणार आहे. हे नियम तत्काळ लागू झाले असून, कोणतीही सवलत नाही असे सरकारने स्पष्ट केले आहे.

काही व्यापारी ’ एफटीए ’ चा वापर करून कमी शुल्कात दागिने आयात करत होते. त्यामुळे भारतीय उत्पादकांना फटका बसत होता. नव्या नियमांमुळे स्वदेशी उद्योगाला चालना मिळणार आहे.अमरावती येथील बाजारपेठेत सुवर्ण अलंकार खरेदीला घेऊन ग्राहकांमध्ये एकच उत्साह दिसून आला. सध्या लग्नसराईचा हंगाम सुरु असून विवाहइच्छुक युवक - युवती यांच्यासमवेत त्यांचे पालक यांच्यासह आप्तेष्ट, हितचिंतक व स्नेहीजनांची सोने खरेदीसाठी एकच गर्दी दिसून येत आहे. लग्न समारंभ म्हणजे हौस - हट्ट पूर्ण करणारे सोहळे म्हणून ओळखले जातात. त्याचाच परिपाक म्हणून सासरची ताई म्हणजेच नणंदबाई सुद्धा आपल्या चोखंदळतेचा परिचय देत दागिन्यांची निवड व आवड लक्षात घेऊन आपल्या होणाऱ्या भावजयीसाठी सोने खरेदी करताना सर्व प्रकारच्या व्हेरायटीज न्याहाळून पाहत असतानाचे चित्र मात्र संपूर्ण बाजारपेठेत लक्षवेधी ठरल्याचे दृश्य यावेळी दिसून आले. लग्नानंतर आपल्या घरात गृहलक्ष्मीचे आगमन होणार या आनंदाने कृतकृत्य झालेल्या विहीणबाई सुद्धा सोने खरेदी करताना कुठलीही तडजोड न करता आपल्या येथील लग्नसोहळा सुखावह - हर्षदायी व अविस्मरणीय व्हावा, ही भावना जपत यंदा सुवर्ण अलंकार तसेच सौभाग्याचे लेणे - मंगळसूत्रापासून ते नेकलेस असो किंवा बांगड्या तसेच अन्य दागिने खरेदी करून घेताना कुठलीही तडजोड आता करायचीच नाही या संकल्पनेचा पुरस्कार करीत व्यस्त असल्याचे चित्र बाजारपेठेवर एक कटाक्ष टाकला असताना यावेळी दिसून आले.

# गाडगेनगर पोलिसांचा धडाकेबाज पराक्रम ; 48 तासांत दरोडेखोर जेरबंद, 1 कोटींचा मुद्देमाल परत !




प्रतिनिधी ८ एप्रिल

**अमरावती :** शहरातील गाडगेनगर पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या सराफा व्यावसायिकावर झालेल्या दरोड्याच्या गंभीर गुन्ह्याचा अवघ्या ४८ तासांत उलगडा करून पोलिसांनी अत्यंत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या कारवाईत सात आरोपींना अटक करण्यात आली असून चोरी गेलेला तब्बल १ कोटींपेक्षा अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करून तो न्यायालयाच्या आदेशानुसार फिर्यादीस परत करण्यात आला आहे.

दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ९.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी सुशांत मनोहर शेरेकर (वय ४३, रा. बालाजी नगर, अमरावती) हे त्यांचे ‘सुमित्रा ज्वेलर्स’ दुकान बंद करून सोने दागिने व रोख रक्कम असलेली पिशवी मोपेडच्या डिकीत ठेवून घरी जात होते. त्याचवेळी मागून आलेल्या काळ्या रंगाच्या कारने त्यांना अडवले. कारमधून उतरलेल्या तीन अज्ञात इसमांनी चाकूचा धाक दाखवत शेरेकर यांना खाली पाडले आणि त्यांच्या मोपेडमधील दागिने व रोख रक्कम असलेली पिशवी घेऊन फरार झाले. या घटनेनंतर गाडगेनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात करण्यात आली. पोलिसांनी तात्काळ हालचाली करत तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे अवघ्या ४८ तासांत चारचाकीतून दरोडा टाकणारे पाच आणि रेकी करणारे दोन अशा एकूण सात आरोपींना अटक केली. आरोपींकडून ६६१.०३० ग्रॅम सोन्याचे दागिने (किंमत अंदाजे ९९,१५,४५० रुपये), रोख १,१९,००० रुपये तसेच गुन्ह्यात वापरलेली चारचाकी, दोन मोटारसायकली, सात मोबाईल आणि तीन चाकू असा एकूण १,१२,३२,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यापैकी १,००,३४,४५० रुपयांचा मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशानुसार दि. ७ एप्रिल २०२६ रोजी पोलीस आयुक्त यांच्या हस्ते फिर्यादीस परत करण्यात आला. ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला,. पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, एसीपी शिवाजी बचाटे,, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, विजया पंधरे, मनोजकुमार मानकर व त्यांच्या पथकाने संयुक्तपणे पार पाडली.

या धडाकेबाज कारवाईमुळे पोलिसांच्या तत्परता, कार्यक्षमता आणि गुन्हे उकलण्याच्या क्षमतेचे पुन्हा एकदा प्रभावी दर्शन घडले आहे. आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

# पंतप्रधान इंटर्नशिप योजनेत तरुणांसाठी नामवंत कंपन्यांत विद्यावेतनासह प्रशिक्षणाची संधी



**अमरावती :** भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना २०२६’ अंतर्गत आता देशातील पहिल्या ५०० नामवंत कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या योजनेचा तिसरा टप्पा आता अधिक व्यापक स्वरूपात सुरू झाला असून, जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र युवक-युवतींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

या योजनेमध्ये उमेदवारांची वयोमर्यादा १८ ते २५ वर्षे निश्चित करण्यात आली आहे. शैक्षणिक पात्रतेमध्ये १० वी, १२ वी उत्तीर्ण, आयटीआय प्रमाणपत्रधारक, पॉलिटेक्निक डिप्लोमा तसेच पदवीधर उमेदवारांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, आता पदव्युत्तर आणि एमबीए पूर्ण केलेले विद्यार्थी देखील या योजनेसाठी पात्र ठरणार आहेत.

निवड झालेल्या उमेदवारांना विद्यावेतन दरमहा ९ हजार रुपये मिळणार आहे. यापैकी ८ हजार १०० रुपये सरकारकडून थेट बँक खात्यात जमा होतील, तर ९०० रुपये संबंधित कंपनीकडून दिले जातील. याशिवाय, रुजू होताना ६ हजार रुपयांचे एकरकमी सानुग्रह अनुदान देखील दिले जाणार आहे. प्रशिक्षणाचा कालावधी ६ ते ९ महिन्यांचा असेल, ज्यानंतर उमेदवारांना अधिकृत प्रमाणपत्र प्रदान केले जाईल. ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे किंवा कुटुंबातील कोणताही सदस्य कायमस्वरूपी सरकारी कर्मचारी आहे, ते या योजनेसाठी पात्र नसतील. तसेच, आयआयटी, आयआयएम यांसारख्या उच्च संस्थांमधील पदवीधर या योजनेचा लाभ घेऊ शकणार नाहीत.

# तापमानात वाढ

**अमरावती :** दोन दिवसांपासून तापमानात वाढ होत असल्याने उष्णतेचा पारा ४० अंशापर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे सकाळी दहा वाजतापासूनच उन्हाच्या झळा बसत असून, दुपारच्या सुमारास रस्ते निर्मनुष्य होत आहेत. उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढणार असून नागरिकांनी घराबाहेर पडताना विशेष काळजी घ्यावी, शक्यतोवर काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, असे सांगण्यात येत आहे.

# मॅफेड्रॉनचा पुरवठा करणारा आतंरराज्य टोळीतील मुख्य सूत्रधार ताब्यात; तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे कारवाई

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अमरावती :** मॅफेड्रॉन (एम.डी.) अंमली पदार्थाचा शहरात पुरवठा करणारा आतंरराज्य टोळीतील मुख्य सुत्रधाराला राजस्थान येथून ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी यांनी तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे उल्लेखनिय अशी प्रभावी कार्यवाही केली आहे.

८ मार्च रोजी पथक यांनी सांयकाळी ६ च्या सुमारास आरोपी अब्दुल फहीम अब्दुल रहीम उर्फ फहिम एफ. बी वय २५ वर्ष, रा. आझाद नगर, अमरावती, शेख अयान शेख रमजान वय २० वर्ष, रा व्दारका नगर, अम यांना ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातुन तीन कोटी अकरा लाख रुपये किमतीचे २ किलो. ८० ग्रॅम (एम.डी.) मॅफेडॉन पाउडर जप्त केले होते.

तपासात आरोपी अजिम असद शेख वय ३६ वष. ’रा. माहिम दर्ज्याच्या मागे माहिम वेस्ट मुंबई यांस सदरचा एम.डी. हा अंमली पदार्थ कोणाकडुन व कोठुन आणला याबाबत विचारणा केली असता त्यांने मांगीलाल उर्फ मांगी गणपतसिंग सिंघावत रा. मिदीयान, ता. मकराना, जि. डिडवाना कुचामन, राजस्थान या इसमांकडुन खरेदी करून आणला होता व तोच माल त्याने वर नमूद आरोपीताना दिल्याचे सांगीतले होते. गुन्हाचे तपासात पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात आरोपीचा शोध घेण्यासाठी तीन पथक राजस्थान राज्यात मागील काही दिवसापासून परिश्रम व वेशांतर करून तेथील स्थानीक पोलीसांचे सहाकार्याने तांत्रिक माहीतीचे आधारे आरोपी मांगीलाल उर्फ मांगी गणपतसिंग सिंघावत रा. मिदीयान, ता. मकराना, जि. डिडवाना कुवामन, राजस्थान यास पोलीस ठाणे अरनोड जिल्हा प्रतापगड, राजस्थान येथून ताब्यात घेतले. सदर गुन्हयातील (एम.डी.) मॅफेडॉन अंमली पदार्थ कोणाकडुन व कोठुन आणला याबाबत विचारणा केली असता त्यांने आरोपी विष्णु उर्फ विजय मोहनलाल गायरी रा. प्रतापगड, (राजस्थान) व राधेश्माम श्रीपाद दमामी रा, प्रतापगड, राजस्थान (फरार) यांच्या कडुन आणल्याचे सांगीतल्याने लागलीच सदर माहीतीवरू विष्णू मोहनलाल गायरी वय ३१ रा. मोहेडा राजस्थान याला सुदधा ताब्यात घेण्यात आले आहे.

आरोपी विष्णु उर्फ विजय मोहनलाल गायरी रा. प्रतापगड व राधेश्याम श्रीपाद दमामी रा, प्रतापगड, राजस्थान या दोघांनी मिळुन प्रतापगड जिल्हयातील नोगावा या गावाच्या नवळपास असलेल्या जंगलातील परिसरात एम.डी. या अंमली पदार्थाचे उत्पादन करण्यासाठी फॅक्ट्री निर्माण केली होती. सदर फॅक्ट्री मधुनच एम.डी. चे उत्पादन करून महाराष्ट्र तसेच इतर राज्यांमध्ये पुरवठा केला जायचा. परंतु प्रतापगड जिल्हा पोलीसांनी काही दिवसांपुर्वी सदर एम.डी.ची फॅक्टरीवर कार्यवाही केली. सदर एम.डी. फॅक्ट्री चे मालक हे राधेश्याम श्रीपाद दमामी रा, प्रतापगड, (राजस्था (राजस्थान) व विष्णू मोहनलाल मोहनलाल गायरी प्रतापगड, राजस्थान हे असुन ते प्रतापगड (राजस्थान), हरीयाणा, मध्य प्रदेश या राज्यांमधील एम.डी. अंमली पदार्थ विरोधी कायदयानव्ये दाखल विविध गुन्हयांमधे फरार आहेत. सदर आरोपी हे राजस्थान स्थानिक पोलीसांना देखील मागील दोन वर्षांपासुन मिळून येत नाहीत. सदर आरोपी यांचे राजस्थान, हरीयाणा व मध्य प्रदेश राज्यामधे न्यायालयाच्या आदेशाने स्टॅंडींग अरेस्ट वॉरंट निघाले असून सदर राज्यातील पोलीस हे कायदेशिर प्रक्रीया करून सदर आरोपीना त्यांच्या गुन्हयांमधे ट्रान्सफर कार्यवाही करणार आहेत.

### सेवन व विक्री करणाऱ्यांवरही कारवाई

अमरावती शहरात एम.डी. बाळगणारे, त्याचे सेवन करणारे, विक्री करणारे यांचेबाबत गोपनिय माहीती संकलीत करण्यात आली असून त्यांच्यावरही नजीकच्या काळात धडक मोहीम राबविण्याबाबत पोलीस आयुक्त यांनी आदेशीत केले आहे. एम. डी. सेवन करणारे इसमांची नावे निष्पन्न झाली असून त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई करणे सुरू केले आहे.

# गझलनवाज भीमराव पांचाळे यांच्या ७५ व्या वर्षानिमित्त अमृत महोत्सव



## अमरावतीत भव्य गझल मैफिलीचे आयोजन

**अमरावती :** मराठी गझल क्षेत्रातील ज्येष्ठ आणि लोकप्रिय गझलनवाज भीमराव पांचाळे यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त अमरावती येथे ‘अमृत महोत्सव’ साजरा करण्यात येणार असून, त्यानिमित्त भव्य नागरी सत्कार आणि गझल मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. इलेक्ट्रॉनिक मीडिया असोसिएशन, अमरावती यांच्या वतीने हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार, १० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे होणार आहे. या कार्यक्रमात गझलप्रेमींना भीमराव पांचाळे यांच्या गझलांचा आस्वाद घेण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ना. चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्हा पालकमंत्री उपस्थित राहणार आहेत. उद्घाटक म्हणून श्रीचंद्र तेजवानी, महापौर म.न.पा अमरावती आणि . नितेश राऊत, अध्यक्ष इलेक्ट्रॉनिक मीडिया असोसिएशन अमरावती उपस्थित राहतील.प्रमुख पाहुण्यांमध्ये अनिल बोंडे, राज्यसभा खासदार, बच्चू कडू, माजी आमदार, संजय खोडके, आमदार, रवी राणा, आमदार, सुलभा खोडके आमदार,प्रताप अडसड, आमदार यांचा समावेश आहे.

# आदिवासी बांधवांना दिली बोअर विहीर बांधून

## प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांचा विशेष पुढाकार

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अमरावती :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ.हेमंत देशमुख यांच्या विशेष पुढाकारातून हिरादेही येथील आदिवासी गावाच्या फाट्याजवळ, श्री हनुमान मंदिर परिसरात बोअर विहिरीचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना, विशेषतः आदिवासी बांधवांना, पिण्याच्या पाण्याची मोठी सोय उपलब्ध झाली आहे. यापूर्वी पाण्यासाठी दूरवर जावे लागत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. मात्र, या बोअर विहिरीमुळे त्या अडचणींवर मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला असून गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रा. डॉ.हेमंत देशमुख यांनी नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत विविध विकासकामांना प्राधान्य दिले असून, या



उपक्रमातून त्यांच्या लोकाभिमुख कार्याची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील मूलभूत गरजांकडे लक्ष देत त्यांनी हा उपक्रम राबवला असून,

### पाणी टंचाई समस्या निकाली

स्थानिक नागरिकांनी त्यांचे मनापासून आभार व्यक्त केले आहेत. या कामाच्या पूर्ततेनंतर परिसरात छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत, अशा सामाजिक उपक्रमांची आजच्या काळात अत्यंत गरज असल्याचे मत व्यक्त केले. तसेच, पुढील काळातही अशाच प्रकारच्या विकासकामांसाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शवली. या प्रसंगी दिपक महाराज, निखिल देशमुख, शिवाजी आवटे, ॲड. निमकर, ॲड. सुनील सातपुते, मंगेश पवार, ओमप्रकाश शोभनते, भीमराव आवटे, राम आवटे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# महिलांनी अर्थकारणाला गती द्यावी – जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी ४ एप्रिल



**अमरावती :** महिला बचतगटांसाठी एक लाख रूपयांचा निधी देण्यात येत आहे. हा निधी शासनाला परत करावा लागणार नाही. त्यामुळे महिलांनी या निधीचा उपयोग उद्योगाच्या विकासासाठी करावी. यामुळे अर्थकारणाला गती मिळणार असून इतरांना प्रेरणा मिळेल, असे मत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी व्यक्त केले.

महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे महिला सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पुरुषांचा जेंडर सेंसीटिव्ह रोल मॉडेल म्हणून सुधारक सन्मान पुरस्कार जिल्हाधिकारी यांच्या शुभ हस्ते आज देण्यात आला. तसेच बचतगटांना एक लाख रूपयांच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी माविमचे वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी डॉ. रंजन वानखडे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय गट, सहायक जिल्हा समन्वय अधिकारी ऋषीकेश घ्यार आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी, विना परतावा देण्यात आलेल्या निधीचा बचतगटांनी निट उपयोग करावा. उद्योगासाठी ही पायाभरणी असून ही मोलाची रक्कम राहणार आहे. या निधीचा चांगला उपयोग करून यशकथा निर्माण कराव्यात. महिला बचतटांसाठी विविध स्टार्टअप कार्य करीत असून त्यांच्याशी जुळावे. यामुळे मार्केटींगची मदत होणार आहे. जिल्ह्यात लाडकी बहिण योजनेतील लाभार्थींची पतसंस्था सुरू करण्यात आली आहे. तसेच महिलांची विविध कार्यकारी सहकारी संस्था सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. यामुळे महिला सक्षमीकरणाला बळकटी मिळणार असल्याचे सांगितले. डॉ. वानखडे यांनी प्रास्ताविक केले. पुनम सोनार यांनी सूत्रसंचालन केले. श्री. घ्यार यांनी आभार मानले. यावेळी जनाराव खंडारे, माधान, ता. चांदूर बाजार, दत्ता कडूकर, तिवरा, ता. धामणगाव, निलेश कोहळे, सुरळी, ता. वरुड यांनी जेंडर सेंसीटिव्ह रोल मॉडेलमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच शक्ती महिला बचतगट, भिलटेक, ता. चांदूर रेल्वे, स्वामी समर्थ महिला बचतगट, शिराळा, ता. अमरावती, आदर्श महिला बचतगट, पूर्णानगर, ता. भातकुली या बचतगटांना धनादेशाचे वितरण करण्यात आले.

६
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि ८ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com







# खाल्ल्या पैशाला जागले, स्वतःचेच फोटो जिओ टॅगिंगला जोडले!

## रिसोड तालुक्यात घरकुल योजनेचा भोंगळ कारभार

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या घरकुलांच्या विविध योजनांमधील कथित घोटाळ्यांनी भ्रष्टाचाराचा कळस गाठला असून, दिवसागणिक धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. सदर भ्रष्टाचारात रिसोड तालुका अग्रस्थानी असल्याची माहिती हाती आली आहे. तालुक्यातील ग्रामीण भागात ' दहा हजार द्या अन् घरकुल अनुदान घ्या ' ही मोहीम काही ग्राम विकास अधिकारी, सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या संगनमताने प्रभावीपणे राबविल्या गेली असून तोच पॅटर्न सद्यस्थितीत सुरू आहे.



प्राप्त माहितीनुसार रिसोड तालुक्यातील ग्रामीण भागात स्थानिक लोकप्रतिनिधी, पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी यांनी कर्तव्याशी ऐशीतैशी करून घरकुल योजनेच्या सर्व नियमांची व निकषांची पायमल्ली केली असल्याचे आता उघड होत आहे. मात्र एक विशेष बाब म्हणजे, ज्यांनी ज्यांनी दहा हजार रुपयांची लाच घेऊन तुमचे काम करून देतो असे लाभार्थ्यांना वचन दिले आहे. अशा काही भ्रष्टाचारी लोकप्रतिनिधींनी आपली ईमानदारी कायम राखली आहे. त्या अनुषंगाने काही गावातील ग्राम पंचायत सदस्यांनी शब्द दिलेल्या लाभार्थ्यांच्या दुसऱ्या हप्त्यासाठी स्वतःचाच फोटो जिओ टॅगिंला जोडले असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आणि त्याहूनही अधिक आश्चर्यकारक बाब म्हणजे हे जिओ टॅगिंग ज्याला अनुदान द्यायचे त्या सबंधित लाभार्थ्यांच्या जागेचे नसून ज्याचे कोणाचे बांधकाम सुरू आहे अशा दुसऱ्याच लाभार्थ्यांच्या जागेचे आहेत.

हा सर्व खळबळजनक प्रकार पंचायत समितीचे अधिकारी, गृहनिर्माण अभियंता आणि सबंधित ग्रामसेवक यांच्या संगनमताने घडला असल्याची चर्चा सुरू आहे. गोरगरिबांसाठी राबविण्यात येत असलेल्या एका महत्वाकांक्षी योजनेची अशी वाट लावण्यात येत आहे.

तर दुसरीकडे जिल्हा परिषदेचे प्रशासन मूग गिळून गप्प आहे. त्यामुळे गल्ली ते दिल्ली भ्रष्टाचाराची पाळेमुळे पोहचली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. परिणामी या गैरप्रकरणाची उच्चस्तरीय समिती स्थापन करून सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

### सक्रिय दलाल, भामटे झाले मालामाल...

प्रधानमंत्री आवास योजना ही ईतर मागास प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकासाठी एक महत्त्वाची योजना आहे. त्यामुळे सर्व सामान्य गरिबांचे पक्क्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. मात्र सदर योजनेचे संनियंत्रण करणाऱ्या यंत्रणेतील अधिकारी व कर्मचारी भ्रष्टाचार करत असल्याचे वास्तव समोर येत आहे. परिणामी गावपातळीवरील ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी आपापले दलाल सक्रिय करून स्वतः मालामाल कसे होता येईल यासाठीच या योजनेचा फायदा घेतला आहे. त्यासाठी ' दहा हजार द्या अन् घरकुल अनुदान घ्या ' ही मोहीम राबविण्यात आली आहे. त्यामुळे ज्यांना हातावर कमावून, पालवावर खावे लागते अशा गरिबांचे खुप मोठे नुकसान झाले आहे. कारण दहा हजार रुपये देणे गोरगरिबांना शक्य होत नाही. मग आपसुकच याचा फायदा धनदांडग्यांनी घेतला आहे. ही जेव्हढी खेदाची बाब आहे तेव्हढीच सबंधित प्रशासनासाठी लज्जास्पद आहे. या गंभीर प्रकाराची आता वरिष्ठ स्तरावरून चौकशी झाली पाहिजे अशा प्रतिक्रिया सर्व सामान्य नागरिक व्यक्त करत आहेत.

## थोडक्यात

### पोलीस अधिक्षक अनुज तारे यांची संकल्पना !

#### पोलिसांसाठी राबविली आरोग्य योजना



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या संकल्पनेतून व श्री दत्त डायग्नोस्टिक लॅब अमरावती यांच्यातर्फे आरोग्य शिबिर राबविण्यात आले आहे. सदर शिबिरात जिल्ह्यातील रिसोड, शिरपूर, मालेगांव व जऊळका रेल्वे पोलीस ठाण्यातील जवळपास १८४ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या उपक्रमासाठी पोलीस उपनिरीक्षक प्रल्हाद पडघान आणि महिला हेड कॉन्स्टेबल बेबी राठोड यांनी परिश्रम घेतले आहे.

कर्तव्य करत असलेल्या पोलीस विभागातील पोलीस अधिकारी अंमलदार व त्यांचे परिवारातील सदस्य करिता, पोलीस स्टेशन रिसोड, शिरपूर, मालेगाव, जवळका रेल्वे येथे आरोग्य तपासणी शिबिर श्री दत्त डायगोस्टिक लॅब अमरावती यांच्यातर्फे राबविण्यात आले. हा उपक्रम पोलीस अधीक्षक कार्यालयातील कल्याण शाखा प्रभावी अधिकारी, पोलीस, उपनिरीक्षक प्रल्हाद पडघान व लेडीज हेड कॉन्स्टेबल बेबी राठोड, यांनी परिश्रम घेतले. या ठिकाणी पोलीस स्टेशन रिसोड चे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी आरोग्य विषयी मार्गदर्शन केले व संपूर्ण मेडिकल टीम डॉ. डोंगरे व स्टॉप अमरावती यांनी सहकार्य केले. पोलीस स्टेशन शिरपूर येथे ठाणेदार केशव वाघ व ँइ्ष तायडे यांनी सहकार्य करून सहभाग घेतला. पोलीस स्टेशन मालेगाव ठाणेदार राजेश खोडे व ए.पी.आय गायकवाड यांनी सहकार्य व सहभाग घेतला.

पोलीस स्टेशन जऊळका रेल्वे ठाणेदार हिवाकर व पोलीस अंमलदार यांनी सहभाग घेतला. या शिबिरामध्ये पोलीस स्टेशन रिसोड, शिरपूर, मालेगाव, जऊळका रेल्वे, असे १८५ पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन अंमलदार व परिवारातील सदस्याने उत्कृष्टपणे सहभाग घेऊन तपासणी करून घेतली असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे.




बातमी खास, दखल हमखास, सिटी न्यूज सुपरफास्ट...

# खनिज उत्खननाची केली पाहणी अन तपासणी !

## गौण खनिजाच्या तस्करीतून कोट्यवधीची उलाढाल, महसूल अधिकारी व खदान मालक मालामाल

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन होत असून मोठ्या प्रमाणात स्वामीत्वधनाची (रॉयल्टी शुल्क) खदान मालक व महसूल प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने खुलेआम चोरी सुरू असल्याचे वृत्त सिटी न्यूज सुपरफास्टमध्ये ५ एप्रिलच्या अंकात प्रकाशित झाले होते. या वृत्ताने महसूल प्रशासनात खळबळ उडाली होती. महसूल विभाग आणि गौण खनिज उत्खनन करणारे खदान मालक यांची मैत्री सर्वश्रुत आहे. सोमवारी ६ एप्रिल रोजी वाशीम व परिसरातील सर्व खदानीची चौकशी करण्यासाठी महसूल प्रशासनाला जाग आली. दोघांची मैत्री असल्यामुळे सोमवारी सर्व खदानचे देवाण-घेवाणीचे व्यवहारही बंद ठेवण्यात आलेत. परंतु महसूल प्रशासनाने 'या' पाहणीतून काय साध्य केले ? असा प्रश्न निर्माण केल्या जात आहे. ही चौकशी फक्त देखाव्यापुर्तीच असून अजूनही महसूल प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी व खदान मालक यांच्या संगनमताने गौण खनिजाचे मंजूर क्षेत्रापेक्षा जास्त जागेवर अवैधरित्या उत्खनन होत असून दोघांच्या भागिदारीने दरमहा कोट्यवधीच्या स्वामीत्वधनाची चोरी होत असल्याचे वृत्त आहे. वाशीम जिल्ह्यात मागील २० वर्षापासुन गौण खनिजाच्या व्यवसायामध्ये विविध राजकीय आणि प्रादेशिक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि धनदांडग्यांनी पुढाकार घेतल्याचे वास्तव आहे. वाशीम व परिसरात ज्या जागेमध्ये गौण खनिज उत्खननाचा महसूल प्रशासनाने परवाना दिलेला आहे. त्या जागेमध्ये मंजूर परवान्यातील अटी व



शर्तीचा भंग करून दररोज लाखो ब्रास गौण खनिजाचे महसूल विभागातील भ्रष्ट अधिकारी व खदान मालक यांच्या संगनमताने शासनाच्या स्वामीत्वधनाची खुलेआम चोरी सुरू असल्याचे वृत्त आहे. तसेच अनेक गावांमध्ये शासनाच्या 'ई' क्लास जमीनीमध्ये व खदानीला लागून असलेल्या शासकीय जमीनीमध्येसुद्धा मोठ्या प्रमाणात उत्खनन करून खदान मालकांची दररोज लाखो रूपयाची उलाढाल होत आहे. या सर्व गैरप्रकाराला महसूल विभागातील सर्व झारीतील शुक्राचार्यांचा खुलेआम पाठींबा असल्याने गौणखनिजाच्या तस्करीतूनच महसूल प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी व खदान मालक यांची एका वर्षात कोट्यवधीची वरकमाई होत असल्याची चर्चा




आहे. महसूल प्रशासनातील प्रामाणिक अधिकाऱ्यांनी वाशीम जिल्ह्यातील सर्व गौण खनिजाच्या खदानीची परवाना दिला त्या दिवसापासून आजपर्यंत केलेल्या उत्खननाची सखोल चौकशी केल्यास मोठे घबाड उघडकीस येवून शासनाला दंडाच्या स्वरूपाने कोट्यवधीचा महसूल जमा होण्याची शक्यता आहे. आता महसूल प्रशासनातील लाभार्थी अधिकारी या प्रकरणी कोणती भूमिका घेणार आहेत ? याकडे जाणकारांचे लक्ष लागले आहे.

## घोटा-चिखली येथे वादळी वाऱ्यासह सोलार पॅनलचे नुकसान !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●




परिसरात २ एप्रिल रोजी मध्यरात्री झालेल्या वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटामुळे शेतकऱ्याच्या सोलर पॅनलचे नुकसान झाले आहे. या घटनेत सोलर पॅनलला तडे गेल्यामुळे संबंधित शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले आहे.

घोटा येथील शेतकरी ज्ञानेशवर सुधाकर मोरे यांनी त्यांच्या गट क्रमांक २३ मधील विहिरीवर महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण महाऊर्जा अंतर्गत प्रधानमंत्री खुँ योजनेतून पाच एचपी क्षमतेच्या कृषी पंपासाठी सोलर पॅनल बसवलेले होते. मात्र २ एप्रिलच्या मध्ये रात्री परिसरात अचानक वादळी वारे आणि विजेच्या कडकडाटासह सुरू झाला. या तीव्र नैसर्गिक परिस्थितीमुळे सोलर पॅनलवर जोरदार तडाखा बसून त्याला तडे गेले. व काही पाट्यांचे नुकसान झाले. परिणामी पंप चालविण्यास अडथळा निर्माण झाला असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# शेतीची मशागत वेळेवर, पैसे मात्र अडकले उधारीवर !

### ट्रॅक्टर चालकांचा आर्त टाहो - 'शेतकरी बांधवांनो, आमची उधारी द्या हो !'
### ट्रॅक्टर चालकांच्या मेहनतीचा मोबदला वेळेत द्या - शेतकरी बांधवांना आवाहन

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

शेतीतील मशागतीपासून ते पीक घरापर्यंत पोहोचवण्यापर्यंत ट्रॅक्टर हे आजच्या शेतीचे मुख्य साधन बनले आहे. वखरपास, नांगरणी, पेरणी, कल्टीवेटर, फवारणी, पीक काढणी आणि माल घरी आणणे अशा अनेक महत्त्वाच्या कामांसाठी शेतकरी ट्रॅक्टर चालकांवर अवलंबून असतात. मात्र, या कामांचा मोबदला देताना अनेक ठिकाणी शेतकरी बांधवांकडून मोठ्या प्रमाणात विलंब होत असल्याचे चित्र आहे. काही वेळा वर्षभर, तर काही ठिकाणी दोन-दोन वर्षे ट्रॅक्टर चालकांना त्यांच्या मेहनतीचे पैसे मिळत नाहीत. 'आज देतो, उद्या देतो' असे सांगत त्यांची टाळाटाळ केली जाते. यामुळे ट्रॅक्टर चालकांवर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. डिझेलचा वाढता खर्च, ड्रायव्हरचा पगार, ट्रॅक्टरची दुरुस्ती व देखभाल, तसेच कर्जाचे हप्ते या सर्व जबाबदाऱ्या त्यांच्यावरच येतात. उत्पन्न वेळेत न मिळाल्याने त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह धोक्यात येत आहे. विशेष म्हणजे, पावसाळ्यासारख्या कठीण परिस्थितीतही जीव धोक्यात घालून ट्रॅक्टर चालक शेतकऱ्यांची सेवा करत असतात. चिखल, खराब रस्ते आणि प्रतिकूल परिस्थितीतही ते शेतीची मशागत आणि माल घरापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी पार पाडतात.



दरम्यान, परिसरातील कुकसा, अंचल, जोगेश्वरी, पिंप्री सरहद्द, केनवड या गावांसह वाशिम जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये ट्रॅक्टर चालकांचा हाच प्रश्न सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. अनेक ठिकाणी चालकांनी उशिरा मिळणाऱ्या मोबदल्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. ट्रॅक्टर चालकांकडून शेतकरी बांधवांना एकच भावनिक विनंती करण्यात येत आहे 'जसे तुम्ही आमचे साथीदार, तसे आम्हीही तुमचेच साथीदार आहोत. तुमचा शेतीमाल वेळेत घरापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आम्ही पार पाडतो. त्यामुळे आमचा मोबदला वेळेत द्या, जेणेकरून आमच्यावर उपासमारीची वेळ येणार नाही.' ट्रॅक्टर चालक हा देखील आपल्या समाजाचा कष्टकरी घटक असून त्याचाही उदरनिर्वाह या व्यवसायावरच अवलंबून आहे. ъ

त्यामुळे त्यांना वेळेत मोबदला मिळणे अत्यंत गरजेचे आहे. शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येत आहे की, शेतीतील कामे पूर्ण झाल्यानंतर किमान ८ ते १५ दिवसांच्या आत ट्रॅक्टर चालकांना त्यांच्या मेहनतीचे पैसे द्यावेत. उधारी टाळावी. शेवटी, ट्रॅक्टर चालक आणि शेतकरी हे दोघेही एकमेकांचे आधारस्तंभ आहेत. परस्पर सहकार्य आणि वेळेवर मोबदला दिल्यास शेती व्यवस्था अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### पीएसआय गिरी निलंबन प्रकरण गाजतोय...

# पैशाचा खेळ, कोण लावत होता मेळ !

***आरोपींना मारहाण, नातेवाईकांवर दबाव. *साडे आठ ते नऊ लाखांची उकळपट्टी * गिरींचे धक्कादायक कारनामे**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम शहर पोलीस ठाण्यातील पीएसआय सुनील गिरी यांच्या निलंबनानंतर आता प्रकरण अधिकच गंभीर वळण घेत असल्याचे चित्र समोर येत आहे. आधीच त्यांच्या कार्यपद्धतीवर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असतांना नव्याने समोर येणाऱ्या आरोपांमुळे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे. एका किरकोळ प्रकरणाला गंभीर गुन्ह्यांचे स्वरूप देत त्यातील आरोपींकडून लाखो रुपयांची वसुली केल्याच्या धक्कादायक आरोपांमुळेच गिरी याचं निलंबन झाल्याची माहिती समोर आली आहे. ज्या लोकांनी पैसे दिले त्याचे पूरावे देखील लवकरच समोर येणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पीएसआय गिरी यांच्यासह एक कर्मचारी आणि या प्रकरणात सहभागी असलेले इतर दोषी पोलीस अडचणीत येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या जिल्ह्यात हा विषय चर्चेचा ठरत आहे.



वाशीम शहर पोलीस ठाण्यात रुजू झाल्यापासून पीएसआय सुनील गिरी हे नेहमी वादग्रस्त राहीले आहे. ज्या कारणामुळे गिरी याचं निलंबन झालं आता हळू हळू ते प्रकरण समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार वाशीम शहर ठाण्यात फेब्रुवारी महिन्यात दोन गटांमध्ये झालेल्या किरकोळ वादाचे प्रकरण गिरी यांनी गंभीर गुन्ह्यात रूपांतर केल्याचा आरोप समोर आला आहे. या घटनेत गिरी यांनी मारहाणीची गुन्हा दाखल न करता या प्रकरणात एका फिर्यादीकडून आर्थिक देवाण घेवाण केल्याचे समजते. गंभीर दुखापत, खंडणी आणि चोरीसारख्या कलमांचा समावेश करून एका गटाविरोधात गुन्हे दाखल केले होते . यानंतर




तपासाच्या नावाखाली गुन्ह्यात थेट सहभाग नसलेल्या युवकांनाही पोलीस ठाण्यात आणून त्यांना बेदम मारहाण करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. इतकेच नव्हे, तर मुख्य आरोपींच्या नातेवाईकांनाही पोलीस ठाण्यात बोलावून त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला. फरार आरोपींना हजर करण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांना धमकावण्यात आल्याने भीतीपोटी संबंधितांनी काही आरोपींना स्वतःहून पोलिसांच्या स्वाधीन केल्याची माहिती आहे. दरम्यान, आरोपी हजर झाल्यानंतर त्यांच्याकडून पैसे उकळण्यासाठी मारहाण करण्यात आली. जामीन मिळू देणार नाही. मिळवायचा असेल तर पैसे द्यावे लागतील. असा दबाव गिरी यांनी टाकल्याचा आरोप आहे. या जाचाला कंटाळून एका नातेवाईकाने दोन आरोपींना जामीन मिळावा यासाठी अडीच ते तीन लाख रुपये दिल्याचे समोर आले आहे. याच प्रकरणात एका आरोपीच्या लहान भावाला उचलून आणून त्याला आई-वडिलांसमोरच बेदम मारहाण करण्यात आली. मुलावर होत असलेली मारहाण पाहून कुटुंबीयांनी पैसे देण्याची तयारी दर्शवली. त्यानंतर दागिने गहाण ठेवून आणि इतर मार्गांनी सुमारे सव्वा दोन लाख रुपये जमा करून ते पोलीस ठाण्यातील एका कर्मचाऱ्यामार्फत गिरी यांच्याकडे दिल्याची माहिती पुढे आली आहे. पुढे यातील आरोपीच्या एका मित्राला त्रास देवून एक लाख रुपये घेतले गेले. तर दुसऱ्या एका मित्राला गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देऊन तीस हजार रुपये




वसूल करण्यात आले. काहींकडून आणखी पैसे वसूल झाले असून हा आकडा एकूण साडे आठ ते नऊ लाख पर्यत गेल्याची माहिती आहे. या प्रकरणी पीएसआय गिरी यांना निलंबित करण्यात आले असले तरी, मंगरूळपीरचे एसडीपीओ यांनी सखोल चौकशी केल्यास सव्वा दोन लाख रुपये घेणाऱ्या कर्मचाऱ्यासह यातील संबंधित दोषी पोलिसांवरही कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या संपूर्ण प्रकरणात आणखी कोण-कोण सहभागी आहे. हे तपासाअंती समोर येणार असून पोलीस दलात या प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

## दुचाकीस्वाराची २ लाख ५० हजाराची रोकड लंपास

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा शहरातील स्टेट बँक चौक वर्धमान प्लाझा कॉम्प्लेक्ससमोर दि.६ एप्रिल २०२५ रोजी दुपारी धाडसी चोरीची घटना घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. स्टेट बँकेजवळ प्रगती नगरातील सेवनिवृत्त शिक्षक किसन गोविंद ताटके हे टू व्हीलर ने जात असताना त्यांना लक्ष्य करून अज्ञात चोरट्यांनी काही वेळेत २ लाख ५० हजार रुपयांची रोकड लंपास केली.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित दुचाकीस्वार बँकेतून पैसे काढून निघत असता दरम्यान, वाहनाची गती कमी होताच चोरट्यांनी संधी साधत गाडीच्या साईडला लटकवलेल्या बॅगमधून रोकड चोरून पळ काढला. ही संपूर्ण घटना अत्यंत चतुराईने आणि वेगाने घडवून आणण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलिस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा कसून शोध सुरू करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात ही चोरी पूर्वनियोजित असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान, या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सर्वसामान्य नागरिकांनी आता बँकेतून पैसे काढताना व नेताना सुरक्षितता बाळगायला पाहिजे, तसेच कारंजा शहर पोलीस स्टेशन ने आता स्टेट बँक चौक मध्ये पोलिसांची कर्मचाऱ्यांची दिवसभर ड्युटी लावायला पाहिजे जेणेकरून असे प्रकार पुढे घडणार नाही व सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेतेचा प्रश्न निर्माण होणार नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
बुधवार, दि.८ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## विभक्त राहणाऱ्या पतीकडून पत्नीला मारहाण

**देऊळगाव / मेरा बु. :** गेल्या काही वर्षा पासून पती पत्नी हे क्षुल्लक कारणावरून विभक्त राहत होते. मात्र याच्याच मनात रागधरून पतीने रस्त्यावर अडवून मारहाण केली. अशा महिलेच्या तक्रारी वरून पोलिसांनी महिलेच्या पती विरुद्ध विविध कलमनव्ये गुन्हा दाखल केला ही घटना सरंबा येथे ७एप्रिल रोजी घडली. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार सरंबा येथील रहिवाशी असलेल्या सविता विलास जगधने वय ५५ वर्ष यांनी तक्रारीमध्ये नमूद केले आहे की, फिर्यादी व आरोपी हे पती पत्नी असून फिर्यादी ही तिची मुलांना घेऊन देऊळगाव येथे राहते या कारणावरून फिर्यादी ही शेतातून काम करून घरी जात असताना आरोपी हा दारू पिऊन पाठीमागून आला व त्याने फिर्यादीस 'तू देऊळगाव मही ला का राहते' असे म्हणून फिर्यादीचे डाव्या हाताचे मनगटावर व कपाळावर काठी मारली. नंतर शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली.

# मलकापूरात नकली नोटांचे रॅकेट उद्ध्वस्त



प्रतिनिधी ८ एप्रिल

**खामगाव :** मलकापूर शहरात नकली नोटांच्या रॅकेटवर अखेर पोलिसांनी मोठा घाव घालत धाडसी कारवाई केली. जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने सोमवारी (दि. ६ एप्रिल) दुपारी सुमारे तीन वाजता बसस्थानकाजवळील स्वराज बेकरी परिसरात सापळा रचून चार आरोपींना तब्बल ९ लाख रुपयांच्या बनावट नोटांसह रंगेहात अटक केली.

## पोलिसांशी झटापटीत पीएसआय जखमी

आरोपींनी पळून जाण्याच्या प्रयत्नात पोलिसांशी झटापट केली असून या झटापटीत पीएसआय अविनाश जायभाये यांना किरकोळ दुखापत झाली आहे. या प्रकरणातील एक आरोपी मात्र फरार होण्यात यशस्वी झाला आहे.आज अटकेतील चौघा आरोपीतांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने दि.९ एप्रिल २६ पर्यंत तिन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

मलकापूर आणि परिसरात नकली नोटांचे रॅकेट सक्रिय असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर एलसीबीने अत्यंत काटेकोरपणे सापळा रचला. आरोपी सोशल मीडियाच्या माध्यमातून नागरिकांना जाळ्यात ओढत असल्याची माहिती समोर आली होती. इन्स्टाग्राम व फेसबुकवर बनावट नोटांचे बंडल दाखवून 'एक लाख द्या, नऊ लाख घ्या' अशा आमिषाने लोकांना फसवण्याची पद्धत या टोळीने अवलंबली होती. पोलिसांनी नकली ग्राहक बनून आरोपींशी इन्स्टावर संपर्क साधत सौदेबाजी केली आणि त्यानंतर आरोपींनी मलकापूर येथे येऊन माल देण्याचे ठरवले. ठरलेल्या योजनेनुसार बसस्थानकाजवळील स्वराज बेकरी परिसरात आरोपी येताच एलसीबी पथकाने त्यांना घेराव घालत पकडले. त्यांच्या ताब्यातून ५०० रुपयांच्या नोटांची १८ बंडले जप्त करण्यात आली. या बंडलमध्ये वरच्या बाजूला अस्सल नोट ठेवून आतमध्ये मोठ्या प्रमाणात बनावट नोटा ठेवण्यात आल्याचे आढळून आले. दरम्यान, पकड टाळण्यासाठी आरोपींनी पोलिसांशी झटापट केली. त्यापैकी एका आरोपीने जवळील छोट्या चाकूने पीएसआय अविनाश अंबादास जायभाये यांच्यावर वार करण्याचाही प्रयत्न केला. या गोंधळात सागर तायडे हा आरोपी फरार होण्यात यशस्वी झाला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

या प्रकरणी अमोल रमेश गोरे (वय २५, रा. रमाई नगर), भरत मधुकर वानखेडे (वय २५, रा. रमाई नगर), अविनाश सुनील तायडे (वय २२, रा. रमाई नगर) आणि चेतन गुलाबराव पाटील (वय २५, रा. महालखेडा, ता. मुक्ताईनगर) या चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. फरार आरोपी सागर तायडे याचाही या गुन्ह्यात समावेश असून सर्वांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात पीएसआय अविनाश अंबादास जायभाये यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश गिरी करीत आहेत.

### पोलिसांशी झटापट करेपर्यंत मजल गेली

नकली नोटांच्या कारवाईत सामील असलेल्या आरोपींनी पोलिसांशी झटापट केली. गुन्हेगारी प्रवृत्तीची मजल कुठपर्यंत गेली आहे हे दिसून येते. त्यातही एक जण फरार होण्यात यशस्वी झाला. या भागात नकली नोटांचे रॅकेट सक्रिय असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर छापा टाकला. जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी उपाय योजले जात आहेत.

## राष्ट्रीय सब-ज्युनिअर कबड्डीत विदर्भाचा संघ विजेता

प्रतिनिधी ८ एप्रिल



**खामगाव :** आळंदी येथे नुकत्याच पार पडलेल्या ३५ व्या सब-ज्युनिअर राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत विदर्भाच्या मुलांच्या संघाने ऐतिहासिक कामगिरी करत विजय मिळवला आहे. यामध्ये खामगावातील खेळाडूंचाही समावेश आहे. विशेष म्हणजे, तब्बल ३५ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर विदर्भाला हे मानाचे विजेतेपद मिळाले आहे. २ ते ४ एप्रिलदरम्यान झालेल्या या अटीतटीच्या स्पर्धेत विदर्भाचे मुलांचे आणि मुलींचे असे दोन्ही संघ सहभागी झाले होते. मुलांच्या संघाने विजेतेपद पटकावले, तर मुलींच्या संघानेही उत्कृष्ट खेळ करत बाद फेरीपर्यत मजल मारली. विदर्भाच्या दोन्ही संघांच्या कामगिरीचे क्रीडा क्षेत्रात कौतुक होत आहे.या यशासाठी विदर्भ राज्य कबड्डी असोसिएशनचे सचिव प्रदीप सिंग ठाकूर, सतीश इखार, बुलढाणा जिल्हाध्यक्ष विजय ऊर्फ बंडू बोदडे (खामगाव), प्रफुल देशमुख (यवतमाळ), वासुदेव गिन्हे (खामगाव), भास्कर वानखेडे (खामगाव), रक्षा मलीये, कल्याणी जोगे, सुभाष तायडे, भाविनी निमखेडे आणि कृष्णा बावणे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे आणि खेळाडूंच्या मेहनतीमुळेच विदर्भाचा झेंडा राष्ट्रीय पातळीवर फडकला आहे. ३५ वर्षांनंतर प्रथमच विदर्भाला राष्ट्रीय विजेतेपद मिळाल्याने बुलढाणा जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. विजयी खेळाडू आणि मार्गदर्शकांचा सत्कार करण्यात आला.

## 350 क्विंटल तांदळाचा ट्रक जप्त!

प्रतिनिधी ८ एप्रिल

**खामगाव :** मोताळा येथून नांदुरामार्गे छत्तीसगडला जाणाऱ्या ट्रकमधून मोठ्या प्रमाणात तांदळाची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर नांदुरा पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत सुमारे ३५० क्विंटल तांदूळ असलेला ट्रक जप्त करण्यात आला.

हा तांदूळ शासकीय सार्वजनिक वितरण प्रणाली (रेशन) अंतर्गत असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

सहायक पोलिस अधीक्षक तथा प्रभारी अधिकारी आदित्य कुमार सिंह यांना ६ एप्रिल रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, लाल रंगाचा एमएच ३७ टी ५५६५ क्रमांकाचा ट्रक मोताळा येथून नांदुरामार्गे छत्तीसगडकडे जात असल्याचे समोर आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली

### रेशनचा तांदूळ असल्याचा संशय : पोलिसांची कारवाई

पोलिस उपनिरीक्षक नितीन चव्हाण यांच्या नेतृत्वात पथक तयार करून खामगाव-मलकापूर मार्गावरील उड्डाणपुलाजवळ नाकाबंदी करण्यात आली.

पोलिसांनी ट्रक अडवून तपासणी केली असता त्यात विविध पोत्यांमध्ये तांदूळ भरलेला आढळून आला. हा तांदूळ शासकीय रेशन व्यवस्थेतील आहे की नाही, याबाबत खात्री करण्यासाठी तहसील कार्यालयातील पुरवठा अधिकाऱ्यांकडे अहवाल मागविण्यात आला आहे. संबंधित अहवालाच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## हवामानातील बदलामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे परिणाम

प्रतिनिधी ८ एप्रिल



**खामगाव:** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानातील सततच्या चढ-उतारामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. पहाटेचा गारवा, दुपारचे कडाक्याचे ऊन आणि अधूनमधून पडणारा पाऊस अशा टोकाच्या बदलांमुळे विशेषतः लहान मुलांमध्ये सर्दी, खोकला आणि गॅस्ट्रोच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

परिणामी शासकीय व खासगी रुग्णालयांच्या ओपीडीमध्ये रुग्णांची मोठी गर्दी दिसून येत आहे.हवामानातील बदलामुळे शरीराची प्रतिकारशक्ती कमी होत असून, व्हायरल ताप व फ्लूचा संसर्ग ही वाढत आहे. दोन ते तीन दिवसांपेक्षा अधिक काळ ताप राहिल्यास किंवा श्वास घेण्यास त्रास होत असल्यास घरगुती उपचारांवर अवलंबून न राहता तातडीने तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन डॉक्टरांनी केले आहे.

**सतर्कता बाळगावी!'**

वातावरणातील बदलामुळे सर्दी, खोकला, ताप यासोबतच विविध आजार बळावत आहेत. नागरिकांनी वेळीच सतर्कता बाळगावी असे आवाहन तज्ज्ञांचे आहे.

वाढत्या उष्णतेमुळे नागरिक, विशेषतः मुले, थंड पेये आणि रस्त्यावरील बर्फाच्या गोळ्यांकडे आकर्षित होत आहेत; मात्र या पदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अस्वच्छ बर्फामुळे उलट्या, जुलाब आणि पोटदुखीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पालकांनी याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. दरवर्षी एप्रिल महिन्यात उष्माघाताचे रुग्ण वाढतात; मात्र यंदा गॅस्ट्रो, खोकला आणि तापाचे रुग्ण अधिक प्रमाणात आढळत आहेत. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागही सतर्क झाला आहे.

## खामगांव तालुक्यातील 79 ग्रामपंचायतींच्या प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध

**खामगांव :** खामगांव तालुक्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत माहे जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत संपत आहे, अशा एकूण ७९ ग्रामपंचायतींच्या प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना आज दिनांक ०७ एप्रिल २०२६ रोजी संबंधित ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

यामध्ये पिंप्री देशमुख, अडगांव, आंबेटाकळी, आवार, भंडारी, बोथाकाजी, चिंचपूर, ज्ञानगंगापूर, गणेशपूर, गारडगांव, गवंढाळा, घाटपुरी, गोंधनापूर, हिंगणा (का.), हिवरखेड, हिवरा खुर्द, जनुना, काळेगांव, कारेगांव बु., कोलोरी, कुंबेफळ, लाखनवाडा बु., मांडका, पाळा, पारखेड, राहुड, शहापूर, शिरजगांव दे., शिर्ला नेमाने, सुटाळा खुर्द, टेंभुर्णा, उमरा अटाळी, वाडी, वर्णा तसेच अंबिकापूर, अंत्रज, आसा, भालेगांव, बोरजवळा, चितोडा, ढोरपगांव, घाणेगांव, हिवरा बु., जळका भडंग, कदमापूर, कंचनपूर, कंझारा, खोलखेड, लाखनवाडा खुर्द, लांजुड, निमकवळा, निपाणा, पळशी खुर्द, पातोंडा, पिंप्री गवळी, पिंप्री कोरडे, पोरज, रामनगर, संभापूर, शेलोडी, शिराळा, सुजातपूर, सुटाळा बु., टाकळी, वाकुड, दधम, बोरी, पिंपळगांव राजा, निरोड, पिंप्राळा, विहीगांव आदी ग्रामपंचायतींचा समावेश आहे. प्रसिद्ध करण्यात आलेली असून, यावर कोणताही आक्षेप अथवा सूचना असल्यास संबंधित नागरिकांनी दिनांक १३ एप्रिल २०२६ पर्यंत तहसिल कार्यालय सादर कराव्यात.

## सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पसमध्ये कॅम्पस ड्राईव्ह ला प्रतिसाद

प्रतिनिधी ८ एप्रिल

**शेगाव :** स्थानिक वसुंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचालित सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस, शेगाव येथे नुकताच 'कॅम्पस ड्राईव्ह' उत्साहात पार पडला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. एकूण ८० विद्यार्थ्यांनी या प्रक्रियेसाठी नोंदणी केली होती.

हा कॅम्पस ड्राईव्ह केवळ स्थापत्य व विद्युत अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये चिरायु पॉवर प्रा. लि. या कंपनीचे सहभाग घेत विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत जी. कुळकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तंत्रनिकेतनच्या प्राचार्या प्रा. प्रीती ए. चोपडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला कंपनीकडून आफताब अहमद (मानव संसाधन अधिकारी), अभय चव्हाण (रचना अभियंता) आणि गुलशन पुरवार (डिजिटल व्यवस्थापक) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योगजगताच्या गरजा, करिअर संधी आणि आवश्यक कौशल्यांविषयी मार्गदर्शन केले.

या उपक्रमाचे यशस्वी आयोजन पदवी विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. संदीप गाडेकर, तसेच पदविका विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी श्रीकृष्ण ढोले आणि विभागातील प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकाऱ्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कोमल जधाळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. श्रीकृष्ण ढोले यांनी केले.या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सागरदादा फुंडकर तसेच राज्याचे कामगार मंत्री व अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ना. ॲड. आकाश फुंडकर यांनी प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाचे कौतुक करत सहभागी विद्यार्थ्यांना भविष्यासाठी दिल्या.

## पाण्याच्या टाकीजवळ अतिक्रमणावरून वाद

**खामगाव :** घाटपुरी येथील पाण्याच्या टाकीजवळ अतिक्रमणाच्या वादातून एका मजुरावर तिघांनी मिळून मारहाण केल्याची दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रदीप भास्कर डाबेराव (३८) रा. इंदिरा कॉलनी, घाटपुरी हे पाण्याच्या टाकीजवळ नळ सोडण्याचे काम करत होते. त्यावेळी त्यांनी आरोपींना येथे अतिक्रमण करू नये, अन्यथा मुख्य पाइपलाइनला गळती व अडथळा निर्माण होऊ शकतो, असे समजावून सांगितले मात्र, या कारणावरून वाद निर्माण झाला.

## कारच्या धडकेत ऑटो रिक्षा उलटला!



प्रतिनिधी ८ एप्रिल

**खामगाव :** शहरातील टिळक पुतळा परिसरात भरधाव कारच्या धडकेत ऑटो रिक्षा उलटल्याची घटना मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या अपघातात ऑटो व दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. माहितीनुसार, भरधाव दिलेल्या वेगातील कारवरील चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने समोरून येणाऱ्या ऑटोला धडक बसली. धडकेची तीव्रता इतकी होती की ऑटो रस्त्यावरच उलटला. त्याच वेळी दुचाकी ऑटोखाली अडकून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने या अपघातात कोणतीही सुदवान जीवितहानी झाली नाही; मात्र तीनही वाहनांचे नुकसान झाले. अपघातानंतर काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. त्यानंतर स्थानिकांनी धाव घेत तीनही वाहने रस्त्याच्या कडेला नेल्याने वाहतूक पुन्हा सुरळीत झाली.

## मसाला पिक लागवडीसाठी शासनाचे अनुदान

### कृषी विभागाचे शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी ८ एप्रिल

**सिंदखेडराजा :** मसाला पिकांचे उत्पादन व उत्पादकता वाढविणे तसेच अपारंपरिक क्षेत्रात मसाला पिकांची लागवड वाढविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सिंदखेडराजा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत मसाला पिकांच्या क्षेत्रविस्ताराला प्रोत्साहन देण्यात येत असून मिरची, आले, हळद तसेच काळीमिरी, लवंग, जायफळ, दालचिनी यांसारख्या मसाला पिकांच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या मालकीची किमान ०.२० हेक्टर जमीन असणे आवश्यक असून मसाला पिकांची नव्याने लागवड करणे बंधनकारक आहे. या योजनेअंतर्गत किमान ०.२० हेक्टर ते कमाल २ हेक्टर क्षेत्रासाठी अनुदान देय राहील.

अनुदानाबाबत सांगायचे झाल्यास, बी वर्गीय मसाला पिके जसे मिरची यासाठी प्रति हेक्टर ५० हजार रुपये प्रकल्प खर्च मान्य असून सर्वसाधारण क्षेत्रासाठी २० हजार रुपये (४० टक्के) व अनुसूचित क्षेत्रासाठी २५ हजार रुपये (५० टक्के) अनुदान देण्यात येणार आहे.

तर आले व हळद या कंद वर्गीय मसाला पिकांसाठी प्रति हेक्टर १ लाख रुपये प्रकल्प खर्च मान्य असून सर्वसाधारण क्षेत्रासाठी ४० हजार रुपये व अनुसूचित क्षेत्रासाठी ५० हजार रुपये अनुदान देय आहे. तसेच काळीमिरी, लवंग, जायफळ, दालचिनी या बहुवार्षिक मसाला पिकांसाठीही त्याच प्रमाणात अनुदान उपलब्ध आहे. लाभार्थी शेतकऱ्यांनी लागवडीसाठी आवश्यक रोपे मान्यताप्राप्त रोपवाटिका, कृषी विद्यापीठांच्या रोपवाटिका, संलग्न कृषी विज्ञान केंद्र, राष्ट्रीय व प्रादेशिक संशोधन केंद्रे तसेच राज्य शासनाच्या मानांकित शासकीय रोपवाटिकांमधून घेणे आवश्यक आहे.

या योजनेसाठी इच्छुक शेतकऱ्यांनी महा-डीबीटा r(mahadbt.maharashtra .gov.in) या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावा. लाभार्थी निवड FCFS (First Come First Serve) यातत्वानुसार करण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या सहायक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा उप कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## खामगावात जलवाहिनीला दोन ठिकाणी गळती

प्रतिनिधी ८ एप्रिल



**खामगाव :** जलवाहिनीला गळती लागल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय झाला. शहरातील पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीला दोन ठिकाणी गळती लागल्याने पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. शेगाव रस्त्यावरील शर्मा टर्निंग तसेच दंडेस्वामी मंदिर परिसरात जलवाहिनीला गळती लागली आहे. त्यात पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. जलवाहिनीला गळती लागल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून या भागात रस्त्यावर पाणी साचत आहे. शर्मा टर्निंग येथे सुरुवातीला किरकोळ गळती असल्याचे वाटत होते; मात्र कालांतराने ती वाढत गेल्याने परिस्थिती गंभीर झाली आहे. सतत वाहणाऱ्या पाण्यामुळे रस्त्याची झीज होत असून, खड्डे निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गळतीमुळे काही पाणीपुरवठ्यावरही परिणाम झाल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. कमी दाबाने पाणी येणे, तसेच काही वेळा पाणीपुरवठा खंडित होणे, अशा समस्या निर्माण झाल्या आहेत.

गेरू माटरगाव येथील पंप हाऊसमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. पंप सुरू न झाल्याने घाटपुरी व वामन नगर या भागांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे प्रभावित झाला असून, नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, संबंधित विभागाकडून बिघाड दुरुस्तीचे काम सुरू असल्याची माहिती मिळत असून, पंप लवकर सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पाणीपुरवठा पूर्ववत करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# त्या महिलेच्या मृतदेहाचे गुढ उकलण्यात पोलिसांना यश..

♦ महिलेचा अर्धवट जळालेला मृतदेह प्रकरणात मोठा खुलासा ♦ महिलेचा मृतदेह जाळल्याची पतीची कबुली

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोला :** अन्नपूर्णा माता मंदिर परिसरात मोकळ्या जागेत महिलेचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळला होता. यामुळे परिसरात खळबळ उडाली. ही हत्या की घातपात? याचा तपास पोलिस करीत असताना मृत महिलेच्या पतीनेच पत्नीची हत्या केल्याचा दावा केला आहे. त्याच्या या दाव्यात किती सत्यता आहे हे तपासले जात आहे. अन्नपुर्णा माता मंदिर जवळ अर्धवट जळालेला मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सर्वोपचार रुग्णालयात पाठवला आहे. पोलिस अधिक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनात डाबकी रोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार दिपक कोळी यांनी मृत महिलेची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू केल्यानंतर या महिलेच्या पतीने दावा करीत त्याच्या



पत्नीचा तो मृतदेह असल्याचे त्याने सांगितले. बार्शिटाकली येथील शाह नामक इसमाने हा दावा केल्याची माहिती समोर येत आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, संशयितांच्या हालचालींचा मागोवा घेतला जात आहे. तसेच स्थानिकांकडून माहिती गोळा करून तपासाची दिशा ठरविण्यात येत आहे. महिलेची आधी हत्या करून पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह जाळण्यात आला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. उत्तरीय तपासणी अहवालातून मृत्यूचे कारण कळू शकेल.

### हत्या केल्यानंतर जाळण्याची मोडस ऑपरेंडी

◆एखाद्याची हत्या केल्यानंतर त्याची ओळख पटू नये म्हणून म्हणून त्याच्या डोक्यावर दगड टाकून चेहरा छिन्नविछिन्न किंवा विद्रूप केला जात असे परंतु आता आरोपींनी मृतकाच्या शरीराला जाळून संपूर्ण पुरावाच नष्ट करण्याची मोडस ऑपरेंडी सुरू केली आहे. याआधी गोरेगाव परिसरात एका महिलेचा मृतदेह असाच जाळण्याचा प्रयत्न केला होता तसेच जुने शहरातील अक्षय नागलकर हत्याकांड मध्ये तर त्याचा संपूर्ण मृतदेह अस्थि सुद्धा विसर्जित करून आरोपींनी संपूर्ण पुरावाच नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु पोलिसांनी एक एक कडी जुळवत सर्व आरोपींना गजाआड केले होते.

# साबरमतीच्या धर्तीवर मोर्णा नदीचा विकास कौतुकास्पद : पालकमंत्री आकाश फुंडकर

♦ आज खासदार अनुप धोत्रे सुद्धा सफाईसाठी उतरले नदीपात्रात

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोला :** भारतीय जनता पक्षाच्या ४७ व्या वर्धापन दिनानिमित्त राबविण्यात येत असलेल्या आपली नदी आपली जबाबदारी या अभियानाचा आज दुसरा दिवस असून ट्रॅक्टर जेसीपी मशीन तसेच सुमारे भाजपाचे पाचशे कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनाच्या सहभागातून मोर्णा नदीतील जलकुंभी काढण्याचे काम सुरू आहे. स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे शहराला सुजलाम सुफलाम करण्यासाठी हे अभियान १२ तारखेपर्यंत सुरू राहील. भारतीय जनता पार्टीच्या या स्वच्छता अभियानाची पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी फोनवरून माहिती घेत भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ता यांचे अभिनंदन करीत लवकरच साबरमती नदीसारखे मोरणा नदीचे रूप पालटेल असा विश्वास व्यक्त केला. या मोहिमेत



शहरातील सर्व सुख्य नागरिक तसेच सामाजिक संघटनांनी सहभागी व्हावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीतर्फे करण्यात येत आहे आज दुसऱ्या दिवशी या सफाई अभियानात आमदार रणधीर सावरकर खासदार अनुप धोत्रे स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल महापौर शारदा खेडकर महानगर अध्यक्ष जयंत मसने,उपमहापौर अमोल घोगे, मनपा गटनेते पवन महल्ले, महामंत्री संजय गोटफोडे, डॉक्टर अभय जैन, संतोष पांडे, संदीप गावंडे, रणजीत खेडकर, श्रीकांत भीरड, राजेंद्र गिरी, सौ वैशालीताई शेळके, सौ चंदाताई शर्मा, सौ अम्रपाली उपरवट, सौ आरतीताई घोगलिया, सौ कल्पनाताई घोटफोडे, नितीन ताकवाले आदी भाजपचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆आज दुसऱ्या दिवशी जिल्ह्याचे खासदार अनुप धोत्रे यांनी सुद्धा आपला सहभाग या अभियानात नोंदविला त्यांनी सुद्धा नदीपात्रात उतरून जलकुंभी बाहेर काढण्याचे काम केले याप्रसंगी ते म्हणाले की मोरणा नदीचे हे साडेआठ किलोमीटरचे पात्र संपूर्णपणे जलकुंबी मुक्त केले जाईल या जलकुंभीचा उपयोग शहरात होत असलेल्या सी जी पी प्लांट साठी व्यावसायिक पद्धतीने केला जाईल.

# आस्थाला नगरसेवक सुनील इन्नानी यांनी दिला आधार

♦ आस्थाच्या उच्च प्रतीच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोला :** कौलखेड भागात राहणाऱ्या पाच वर्षांच्या चिमुकल्या आस्था वरटकार हिच्या डोक्यावरून आई-वडिलांचे छत्र हिरावले गेले. नाभिक समाजातील या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. पण या अंधारात आशेचा किरण बनून उभे ठाकले, नगरसेवक सुनील इन्नानी.

आस्था हुशार आहे, तिची शिकण्याची जिद्द मोठी आहे, हे तिचे आजोबा दुर्योधन वरटकार जाणून होते. आपल्या नातीने मोठ्या शाळेत शिकावं, अशी त्यांची मनापासून इच्छा होती, पण परिस्थिती आडवी येत होती. ही माहिती जेव्हा सामाजिक कार्यकर्ते निखिल ठाकूर यांनी सुनील इन्नानी यांच्यापर्यंत पोहोचवली, तेव्हा त्यांनी क्षणभरही विलंब न लावता आस्थाच्या १० वी पर्यंतच्या उच्च दर्जाच्या शिक्षणाचा संपूर्ण



खर्च उचलण्याचा निर्णय घेतला. सहसा एखादे पद मिळाले की बडेजाव वाढतो, पण सुनील इन्नानी यांनी वेगळीच वाट निवडली. वरटकार कुटुंबाला जेव्हा इन्नानी नगरसेवक झाल्याचे समजले, तेव्हा ते त्यांचे अभिनंदन करण्यासाठी त्यांच्या घरी जाणार होते. मात्र, कुठलाही अहंकार न बाळगता सुनील इन्नानी यांनी स्वतः पत्नीसह वरटकार यांचे घर गाठले. एका नगरसेवकाने स्वतःहून घरी येऊन मदतीचा हात द्यावा, हे पाहून आजोबांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

गेल्या अनेक वर्षांपासून समाजाप्रती आपले कर्तव्य निमूटपणे आणि निस्वार्थ भावनेने पार पाडणारे सुनील इन्नानी यांनी दाखवून दिले की, 'मनाची श्रीमंती' ही पदापेक्षा मोठी असते. केवळ आर्थिक मदतच नाही, तर वरटकार कुटुंबाला भविष्यात लागेल ती सर्व मदत करण्याची हमीही त्यांनी दिली आहे. आज जेव्हा राजकारणाकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाते, तेव्हा सुनील इन्नानी यांच्यासारखी माणसं सामान्य माणसाच्या 'आस्थे'चा आधार बनताना दिसतात. त्यांच्या या संवेदनशीलतेमुळे एका अनाथ मुलीला केवळ शिक्षणच नाही, तर सन्मानाने जगण्याचे बळ मिळाले आहे.

# नागरी सुविधा केंद्रात जन्म मृत्यू प्रमाणपत्रासाठी रांगा

### नागरिकांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागते

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोला :** जन्म मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी महापालिकेने टिळक रोडवर भरतिया रूग्णालयाच्या आवारात नागरी सुविधा केंद्र सुरू केले आहे. परंतु या ठिकाणी कामे लवकर होत नसल्याने रांगेत उभे राहावे लागत आहे. तसेच कनेक्टिव्हिटी नसेल तर वाट पाहण्यासाशिवाय गत्यंतर नाही. विविध प्रकारच्या अडचणी निर्माण झाल्यामुळे नागरिक त्रासले आहे. महापालिका प्रशासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

जन्म मृत्यू प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी नागरी सुविधा केंद्रात मोठ्या प्रमाणात गर्दी दिसते. त्यामुळे संबंधितांची वाहने रस्त्यावर उभी



राहतात. त्यामुळे हे सुविधा की असुविधा केंद्र आहे असा प्रश्न आहे. या बाबत अनेकांनी नाराजी व्यक्त केली. लोकांना जन्म मृत्यू प्रमाणपत्र विविध कामांसाठी आवश्यक असते. त्यामुळे ते तातडीने उपलब्ध व्हावे अशी अपेक्षा असते. मात्र सध्या विविध कारणांमुळे होत असलेला विलंब दूर व्हावा अशी नागरिक अपेक्षा व्यक्त करीत आहेत. महापालिका प्रशासनाने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन व्यवस्था करावी. तसेच संबंधितांना प्रमाणपत्र तातडीने उपलब्ध होईल याकडे लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे.

महत्त्वाच्या डॉक्यूमेंट साठी खोळंबा होत असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी संबंधितांची अपेक्षा आहे.

# घुसर येथे सामाजिक कार्यकत्यांनी केले पानपोईचे उद्घाटन

प्रतिनिधी ८ एप्रिल

**घुसर :** घुसर आणि पाणी विसर असे म्हटले जाते. पाण्याची भीषण टंचाई असते. त्यामुळे गावातील सामाजिक कार्यकर्त्यांनी बसस्टँड वर पानपाईचे उद्घाटन केले. गावातील बाळू गव्हाळे, विकास पागृत, संजय पागृत, अशोक शिरसाठ, संतोष कोळकर, भीमराव गोपनारायण, जयेश्वर गोपनारायण, सुभाष रायबोले, पवन कांगटे, सुरेश कांगटे, बाबूलाल कांगटे, सामाजिक कार्यकर्ते विकास पागृत आणि अशोक शिरसाठ यांनी गावातील पाणी टंचाई विषयी सबोधित केले. या कार्यक्रमाला गावातील नांगरिक उपस्थित होते.



# लिनेस क्लब ऑफ अकोला कडून पशू पक्ष्यांसाठी दाना पाण्याची व्यवस्था

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोला :** अकोल्यातील गर्मीचा परिणाम पशू पक्ष्यांवर होऊ नये म्हणून लिनेस क्लब ऑफ अकोला तर्फे दाना पाण्याची व्यवस्था करण्यात आली. एक साथ एक लक्ष्य, उज्ज्वल समाजाचे निर्माण हे ब्रीद वाक्य घेऊन प्रांताध्यक्षा लि. कल्पनाजी देशमुख, रिजन चेयरपर्सन लि. ममताजी सूर्या यांच्या मार्गदर्शनाखाली लिनेस क्लब ऑफ अकोला अध्यक्षा लि. राजेश्री समनपुरे (जयस्वाल), सचिव लि. वनिता बिजवे, कोषाध्यक्षा लि. अलका उमाळे आणि सहका-यांनी प्रकल्प राबविला.

४ एप्रिल रोजी रणपिसे नगर येथील शक्तीनगर भागात शोभा राठी



यांच्या घराजवळ पक्ष्यांसाठी दाना-पाण्याची व्यवस्था करण्यात आली. तसेच, त्या मार्गावरून येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांसाठी पिण्याच्या थंड पाण्याची सोय म्हणून पाण्याचा रांजण (माठ) बसवण्यात आला. दुसऱ्या दिवशी, ५ एप्रिल रोजी क्लब अध्यक्षा राजेश्री समनपुरे यांच्या निवासस्थाना समोरही वाटसरूंसह गायी, म्हशी, शेळ्या आणि कुत्र्यांसाठी पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था म्हणून २ कुंड ठेवण्यात आले. तसेच रतनलाल प्लॉट येथील पुष्पराज पुष्पाजी यांच्या घराबाहेर येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना उन्हापासून दिलासा देण्यासाठी पाणपोई सुरू करण्यात आली.यामुळे असंख्य पशु-पक्षी, पाळीव प्राणी आणि नागरिकांना दिलासा मिळाला आहे. लिनेस क्लबच्या मानवीय कार्याची प्रशंसा केली जात आहे.

# न्यू तापडिया नगरात पथदिव्यांचा प्रश्न कायम

♦ अंधारामुळे नागरिक त्रस्त, अपघाताचा धोका वाढला

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोला :** शहरातील न्यू तापडिया नगर परिसरात रेल्वे लाईन आणि रस्त्याच्या बाजूला पथदिव्यांचे खांब उभारण्यात आले असले तरी अद्याप लाईट बसवण्यात आले नसल्यामुळे नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. तापडिया नगर येथील रेल्वे पुलाच्या परिसरात स्ट्रीट लाईटसाठी खांब उभारण्यात आले आहेत. मात्र, अनेक दिवस उलटूनही या खांबांवर लाईट बसवण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सायंकाळनंतर संपूर्ण परिसर अंधारात बुडत असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा



लागत आहे. विशेषतः महिला, विद्यार्थी आणि कामावरून परतणारे नागरिक यांना अंधारामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच, पुलावरून जाणाऱ्या वाहनचालकांनाही अंधारामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

महानगरपालिकेने तातडीने या ठिकाणी स्ट्रीट लाईट बसवून नागरिकांची समस्या सोडवावी.

# अपघातात अल्पवयीन मुलाचा मृत्यू, मुलगी गंभीर जखमी

प्रतिनिधी ८ एप्रिल

**तेल्हारा :** तेल्हारा तालुक्यातील तेल्हारा–अडसूळ मार्गावर आज झालेल्या भीषण अपघातात एका अल्पवयीन मुलाचा मृत्यू झाला असून एक अल्पवयीन मुलगी गंभीर जखमी झाली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चारचाकी मारुती सुझुकी अल्टो क्र. एमएच २० बीवाय ५७३० हे वाहन तेल्हारा कडून अडसूळकडे जात होते, तर दुचाकी क्र. एमएच ३० सीए ०९८१ तेल्हाराकडे येत होती. यावेळी समोरासमोर झालेल्या जोरदार धडकेत दुचाकीचा पूर्णपणे चुराडा झाला, तर चारचाकी वाहनाच्या पुढील भागाचेही मोठे नुकसान झाले. या अपघातात अभिजित सोळंके (वय १७, रा. जउडका) याचा जागीच मृत्यू झाला. तर समीक्षा डाबेराव (वय १७) ही गंभीर जखमी झाली असून तिला प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी अकोला येथे हलवण्यात आले आहे. दरम्यान, अपघात घडत असताना मागून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीचीही या वाहनांना धडक बसली. या घटनेत त्या दुचाकीवरील व्यक्तीही जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. सदर दुचाकी ही मृत अभिजितच्या मित्राची असल्याची माहिती समोर आली आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतकार्य करत जखमींना बाहेर काढले व रुग्णालयात हलवले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पुढील तपास सुरू केला आहे.

### वाढते अपघात चिंतेचा विषय

◆तेल्हारा तालुक्यात वाढत्या अपघातांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. अल्पवयीनांकडून वाहन चालवणे, वेगमर्यादेचे उल्लंघन आणि वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष ही अपघातांची प्रमुख कारणे असल्याचे दिसून येत आहे. प्रशासनाने यावर तातडीने कडक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# पिंपळगाव हांडे येथे शॉर्ट सर्किटमुळे 35 क्विंटल गहू जळून खाक

### नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांची प्रशासनाकडे मागणी

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोला :** बार्शीटाकळी तालुक्यातील पिंपळगाव हांडे येथे गव्हाच्या शेताला आग लागून मोठे नुकसान झाले. शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत शेतकऱ्याचा तयार गहू जळून खाक झाला असून प्रशासनाकडून तात्काळ पंचनामा करून मदत देण्याची मागणी होत आहे.

पिंपळगाव हांडे येथील शेतकरी पंजाबराव हांडे यांच्या तीन एकर शेतामध्ये गव्हाचे पीक उभे होते. काही गहू काढलेला असताना उर्वरित पीक सोंगणीसाठी तयार होते. मंगळवार, ६ एप्रिल रोजी दुपारी



अचानक वीजेच्या खांबावर शॉर्ट सर्किट होऊन लाईनचे तारा खाली पडले. शेतात कोरडा गहू असल्यामुळे काही क्षणातच आगीने भयंकर रूप धारण केले. गावातील शेतकरी आग विझवण्यासाठी धावले, मात्र आग इतकी तीव्र होती की काही मिनिटांत संपूर्ण शेत जळून खाक झाले.या आगीत अंदाजे ३५ क्विंटल गहू तसेच थ्रेशरमधून काढलेले गव्हाचे पोतेही जळून गेले. या घटनेमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.दरम्यान, विद्युत विभाग आणि कृषी विभागाने तात्काळ घटनास्थळी पाहणी करून पंचनामा करावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्याला मदत द्यावी.

# शेतातील स्प्रिंकलर चोरणारी टोळी गजाआड

प्रतिनिधी ८ एप्रिल

**अकोला:** जुने शहर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या खरप गावातील शुभम गोंडचवर त्यांच्या शेतातील स्प्रिंकलरची चोरी करताना काही इसम दिसून आल्याने त्यांनी त्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला परंतु चोर नऊ स्प्रिंकलर पाईप घेऊन फरार झाले घटनेची तक्रार जुने शहर पोलीस स्टेशनला केली असता पोलिसांनी जुने शहरातील रमाबाई आंबेडकर नगर निवासी शेख फैजल शेख यूसुफ, शुभम उर्फ बंटी जितेश वंजारी, राहुल महादेव कांबळे यांना अटक करीत त्यांच्याकडून फिर्यादीचे चोरी गेलेले एकूण नऊ लोखंडी पाईप असलेले स्पिंकलर पंचा समक्ष जप्त केले.

# तेल्हारा–माळेगाव बाजार रोडवर गौण खनिजाचा ढीग

प्रतिनिधी ८ एप्रिल

**तेल्हारा :** तेल्हारा माळेगाव बाजार मुख्य मार्गावर काही दिवसांपूर्वी अज्ञात अवैध गौणखनिज उत्खनन करणाऱ्यांनी प्रशासनाच्या कारवाईच्या भीतीने रस्त्याच्या मधोमधच गौणखनिजाचा मोठा ढीग टाकून पळ काढल्याची घटना समोर आली आहे. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून हा ढीग जसाच्या तसा पडून असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. हा मार्ग दैनंदिन वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असून शेकडो नागरिक, शेतकरी, व्यापारी तसेच विद्यार्थी रोज या रस्त्याचा वापर



करतात. अशा परिस्थितीत रस्त्याच्या मध्यभागी टाकलेला हा ढीग अपघातास आमंत्रण देत असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनचालकांना हा ढीग स्पष्टपणे दिसत नसल्याने गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानिक प्रशासन, महसूल विभाग किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यापैकी कोणत्याही यंत्रणेकडून अद्याप या प्रकरणाची दखल घेतलेली दिसत नाही. त्यामुळे 'हा ढीग हटवण्याची जबाबदारी नेमकी कोणाची?' असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. जर एखादा अपघात झाला तर त्याची जबाबदारी कोण घेणार, याबाबतही संभ्रम निर्माण झाला आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK